रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ७३
www.ramprahar.com

मंगळवार, ३० सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

मिठाईत भेसळ करणाऱ्यांनो सावधान! निरीक्षक सज्ज/२

पोलादपुरात विविध विषयांवर आढावा बैठक/५

रायगडच्या रोशनीची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड/८

## देशात यंदा सरासरीपेक्षा अधिक पावसाची नोंद



**पुणे :** यंदाचा मान्सून हंगाम देशाला चांगल्या पावसाचा राहिला. देशातील २८ राज्ये आणि आठ केंद्रशासित प्रदेशांपैकी तब्बल २१ राज्यांनी जून ते सप्टेंबर या चार महिन्यांतील पावसाची सरासरी पार केली, तर देशात सरासरीपेक्षा आठ टक्के अधिक पावसाची नोंद झाली. यंदाचा मान्सून हंगाम ३० सप्टेंबर रोजी संपत आहे. जून ते सप्टेंबर या चार माहिन्याचा हंगाम संपूर्ण देशासाठी चांगला रहिला. अनेक भागात अतिवृष्टीने हाहाकार निर्माण केला असला तरीही देशाच्या ५२ टक्के भागात म्हणजे २१ राज्यांमध्ये सरासरी इतका पाऊस झाला. सर्वाधिक पाऊस राजस्थान (७१%) आणि हिमाचल प्रदेशात (४०%) झाला आहे. मात्र अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय आणि बिहार या चार राज्यात मात्र कमी पावसाची नोंद झाली, परंतु खूप कमी पाऊस (अवर्षणग्रस्त भाग) देशात यंदा कुठेही नाही.

# राज्यातील सामाजिक, राजकीय आंदोलनाच्या ७७ खटल्यांना दिलासा



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील धार्मिक, राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या २०१ अर्जदारांपैकी ७७ अर्जदारांवरील खटले मागे घेण्याबाबत शासनाने नेमलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने शिफारस केली आहे. सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञानमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी ही माहिती दिली.

राज्यातील राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान दाखल करण्यात आलेले खटले मागे घेण्याबाबत शासनाने नेमलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक सह्याद्री अतिथीगृहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मंत्री ॲड. शेलार होते. बैठकीस विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव उदय शुक्ला, अभियोग संचालनालयाचे संचालक अशोक भिल्लारे, गृह विभागाचे उपसचिव चेतन निकम तसेच राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

स्त्रीविषयक गुन्हे, गंभीर स्वरूपाचे खटले, वैयक्तिक व दिवाणी प्रकरणे ही शासनाच्या धोरणांतर्गत माफ केली जाऊ शकत नाहीत. त्यामुळे अशा प्रकरणावरील खटले मागे घेण्यास स्पष्ट नकार देण्यात आला आहे तसेच आजी माजी आमदार, खासदार यांच्याशी संबंधित सहा प्रकरणांबाबत शासन निर्णय व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबई उच्च न्यायालयातच अंतिम निर्णय घ्यावा लागेल. त्या दिशेनेही पावले उचलण्यात येत असल्याचेही मंत्री शेलार यांनी सांगितले.

गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी, कोरोना काळातील सामाजिक कार्यक्रम, कामगार आंदोलन अशा विविध पार्श्वभूमीवर झालेले खटले नवीन अर्जांच्या आधारे पुनर्विचारासाठी खुले आहेत. या संदर्भात लवकरच पुन्हा बैठक घेण्यात येणार आहे. त्याआधी सर्व गणेशोत्सव मंडळे, नवरात्रोत्सव मंडळे, सामाजिक संस्था, युनियन प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी शासनाकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहनही मंत्री शेलार यांनी केले.




# विकसित भारत घडविण्यात युवाशक्तीचा सिंहाचा वाटा असेल

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा विश्वास



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपला भारत २०४७मध्ये विकसित देश म्हणून उदयास येणार आहे आणि यामध्ये युवाशक्तीचा सिंहाचा वाटा असेल, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला. ते खांदा कॉलनीत आयोजित विकसित भारत युवा कनेक्ट कार्यक्रमात बोलत होते.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, मुंबई विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना कक्ष तसेच केंद्रीय युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित भारत युवा कनेक्ट कार्यक्रमाचे आयोजन सोमवारी (दि. २९) महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते.

देशाचे सेवाव्रती पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी अभीष्टचिंतन वर्षानिमित्ताने हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमास केंद्रीय युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयामार्फत गुरदित सिंग वोहरा आणि आशुतोष सिंग, रायगड जिल्ह्याचे युवा अधिकारी अमित पुंडे, एनएसएसचे जिल्हा समन्वयक प्रा.टीपी. मोकल, क्षेत्र समन्वयक डॉ. दत्ता हिंगमिरे उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी युवावर्गाशी मुक्त संवाद साधला. गुरदित सिंग यांनी युवकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७च्या संकल्पनेबाबत माहिती दिली. (पान २ वर..)

## बारावीच्या विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यात होत असलेली अतिवृष्टी आणि त्यामुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यास अडचण येत आहे. त्यामुळे २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य परीक्षा मंडळाने घेतला आहे.

राज्यातील इयत्ता बारावीच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना परीक्षा अर्ज भरण्याची आधी ३० सप्टेंबर ही शेवटची मुदत होती, मात्र मराठवाडा, नाशिक, सोलापूर, अहिल्यानगरसह राज्यात होत असलेल्या अतिवृष्टिमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मुदतीत परीक्षेसाठी अर्ज भरणे शक्य नसल्याने अनेक विद्यार्थ्यांनी, पालकांनी अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याची मागणी केली होती.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांना दूरध्वनी करून मुदतवाढ देण्याबाबत निर्देश दिले. शिक्षण मंत्र्यांनी लगेचच राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांच्याशी संपर्क केला आणि अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यास सांगितले. त्यानुसार शिक्षण विभागामार्फत परिपत्रक जारी करून २० ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

याचबरोबर बाह्य पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीदेखील अर्ज भरण्याची मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत वाढविण्यात आली आहे तसेच नवीन परीक्षा केंद्रासाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत १० ऑक्टोबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

## अहिल्यानगरात दोन गटांमध्ये राडा

■ २२ जण पोलिसांच्या ताब्यात



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

अहिल्यानगर शहरात सोमवारी (दि. २९) सकाळी दोन गटात राडा झाल्याची घटना घडली. रास्ता रोको, दगडफेक करणाऱ्या २२ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

नवरात्रीनिमित्त अहिल्यानगरमध्ये दुर्गादौडचे आयोजन करण्यात आले होते. ही दौड शहराच्या मध्यवर्ती माळीवाडा भागातून जाणार होती. तिथे स्वागतासाठी काढण्यात आलेली रांगोळी आक्षेपार्ह असल्याची तक्रार करत जमावाने गुन्हा दाखल करण्याची मागणी कोतवाली पोलिसांकडे केली. दरम्यान, दुसऱ्या बाजूचा जमावही पोलीस ठाण्यात जमा झाला. दोन्ही बाजूने घोषणाबाजी सुरू झाली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. लाठीमाराचा निषेध करण्यासाठी एका गट कोठला भागात जमा झाला व महामार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरू केले. दगडफेकही झाली. पोलिसांनी पुन्हा लाठीमार केला. नंतर परिस्थिती नियंत्रणात आली.

## निवडक

### पहलगाम हल्ल्यानंतर बंद केलेली पर्यटनस्थळे खुली

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीर प्रशासनाने सोमवारी (दि. २९) काश्मीर खोऱ्यातील सात प्रमुख पर्यटनस्थळे पुन्हा खुली केली. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर खबरदारी म्हणून ही ठिकाणे बंद करण्यात आली होती. सुरक्षेचा आढावा घेतल्यानंतर जम्मू आणि काश्मीर विभागांमधील तात्पुरत्या स्वरूपात बंद केलेली काही पर्यटनस्थळे पुन्हा उघडण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### भारत-पाकिस्तान क्रिकेट संघ पुन्हा भिडणार!

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट टीमने आशिया कप स्पर्धेत पाकिस्तानला धूळ चारून विजेतेपद पटकाविले. क्रिकेटमधील हे पारंपरिक प्रतिस्पर्धक पुन्हा एकदा आमनेसामने येणार आहेत. महिला विश्वचषक स्पर्धेला मंगळवार (दि.३०)पासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत भारतीय संघाचा दुसरा सामना ५ ऑक्टोबर रोजी पाकिस्तानशी होणार आहे.

## पाली फाटा येथे एसटी बस आणि ट्रकचा अपघात

■ १५ प्रवासी जखमी, एक गंभीर



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली-पेण राज्यमार्गावर पाली फाटा येथे सोमवारी (दि. २९) दुपारी कोळशाने भरलेला ट्रक आणि एसटी बस यांची धडक झाली. या अपघातात बसमधील १५ प्रवाशांना दुखापत झाली असून त्यांना खोपोली नगरपरिषद रुग्णालयात दाखल करण्यात आले. यातील एक गंभीर जखमी महिला प्रवाशाला अन्यत्र उपचारासाठी हलविण्यात आले आहे.

अलिबाग येथून सकाळी ९.३० वाजता संभाजीनगरला जाण्यासाठी निघालेली एसटी बस दुपारी १२च्या सुमारास खालापूर तालुक्यातील पाली फाटा येथे आली असता वडखळ येथून निघालेला कोळसा भरलेल्या ट्रकने धडक दिली. धडक इतकी भयंकर होती की स्फोट झाल्याचा आवाज झाला असे बसचालकाने बोलताना सांगितले. या अपघातानंतर बस दुसऱ्या अन्य ट्रकला जाऊन धडकली.

या अपघातात १५ प्रवाशांना दुखापती झाल्या आहेत. त्यातील कुंदा भरणे (वय ५५) यांना गंभीर दुखापतीमुळ अन्यत्र हलविण्यात आले आहे. अपघातानंतर कोळसा भरलेल्या ट्रकमधून मोठ्या प्रमाणात कोळसा रस्त्यावर पसरला होता. दरम्यान, अपघात होताच हेल्प फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी घटनास्थळी भेट देऊन मदतीचा हात दिला.

# यशस्वी होण्यासाठी ध्येय गरजेचे -लोकनेते रामशेठ ठाकूर

## रिटघर येथे कर्मवीर जयंती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षण हे आवश्यक आहेच, शिवाय कला क्षेत्रही महत्त्वपूर्ण आहे. विविध क्षेत्रांमध्ये यशस्वी होण्यासाठी आपल्यात चांगले गुण आणि ध्येयवृत्ती असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रिटघर (ता.पनवेल) येथे केले.

रयत शिक्षण संस्थेच्या रिटघर येथील श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जयंती सोहळा आणि गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभ लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि. २९) झाला. त्या वेळी ते बोलत होते. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी तसेच विद्यालयाला काही कमी पडू द्यायचे नाही हे आमचे धोरण आहे, असे त्यांनी सांगितले.

यानिमित्त आयोजित रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या करण्यात आले. त्यानंतर विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या, मागील वर्षी पाचवी ते बारावी परीक्षेत प्रथम तीन आलेल्या तसेच जिल्हा, तालुका, विभागस्तरीय कुस्ती स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या सोहळ्याला संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, एम.के.कोंगेरे, व्ही.यु. जगताप, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य सुभाषशेठ भोपी, बाळाराम भोपी, बळीराम भोपी, राजेश भोपी, वंदना भोपी, प्रल्हाद भोपी, वासुदेव भोपी, दीपक पाटील, महेश पाटील, विष्णू भगत, राजन भगत, प्रल्हाद भोपी, विश्वनाथ भोपी, नवनाथ भोपी, कमळाबाई वाघमारे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक आर.बी. कारंडे यांनी केले. आराध्या भगत, नव्या जांभळे, अशोक पाटील यांनी कर्मवीरांच्या जीवन चरित्रावर भाषण केले. स्कूल कमिटी सदस्य दीपक पाटील, जयवंत भोपी, प्रल्हाद भोपी यांनी विद्यार्थांना खाऊचे वाटप केले.




## पनवेलमध्ये नवदुर्गांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सोसायटी मित्र मंडळ आयोजित नवरात्रोत्सवात सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत. याचाच एक भाग म्हणून विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नवदुर्गांचा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि.२८) सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला माजी सहाय्यक पोलीस आयुक्त विनोद चव्हाण, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील घरत, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुरेखा मोहोकर, सारिका भगत, सपना पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी पोलीस निरीक्षक विमल बिडवे, डॉ. सुजाता गायकवाड, ॲड. सीमा भोईर, सामाजिक कार्यकर्त्या नम्रता धवडे, तृप्ती पालकर, ममता दोशी, रेश्मा कुरूप, गौरी धात्रक, रश्मी रामगरिया या नवदुर्गांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

## बालगृहातून पाच मुलींनी केले पलायन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील मुलींच्या बालगृहातून पाच मुलींनी पलायन केले. या मुलींचे वय १२ ते १७ वर्षे असल्याने याबाबत पनवेल शहर पोलीस मुलींना फूस लावून पळून नेल्याचा अपहरणाचा गुन्हा नोंदविण्यात आला. दरम्यान, काही तासांमध्ये त्यापैकी तीन जणी सुखरूप असल्याचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले.

या पाच मुलींना शिक्षा म्हणून नव्हेतर पुनर्वसनाच्या हेतूने या बालगृहात ठेवण्यात आले होते. यातील एक मुलगी उरण येथील एका प्रकरणातील पीडित आहे, तर इतर चार मुली या तळोजा, पनवेल व कर्जत येथील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतील असून त्यांचे पालक नसल्याने त्यांना या बालगृहात ठेवण्यात आले होते. बालगृहात रहायचे नाही म्हणून या मुली पळून गेल्याचे सापडलेल्यांपैकी काही मुलींनी सांगितले.

### तिघी सापडल्या

पोलिसांनी इतर तपास यंत्रणांकडे केलेल्या समन्वयामुळे या शोधमोहीमेला यश आले. पाचपैकी तीन मुली सापडल्या. यातील एक मुलगी उरण येथील चिरनेर येथे तिच्या गावी सापडली. दुसरी मुलगी मुंबई येथील बांद्रा येथे रेल्वे पोलिसांना सापडली. तिच्यासोबत कोण नसल्याने या मुलीला डोंगरी येथील बालगृहात ठेवण्यात आले आहे तसेच तिसरी मुलगी सातारा जिल्ह्यातील तीच्या मूळ गावी गेल्याचे पोलिसांना समजले. उर्वरित दोन मुलींचा शोध तसेच घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

# खेळाच्या मैदानावरही ऑपरेशन सिंदूर!

■ पंतप्रधान मोदींकडून भारतीय संघाचे कौतुक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाने अंतिम सामन्यात पाकिस्तानवर पाच विकेट्सने दणदणीत विजय मिळवत नवव्यांदा आशिया चषक जिंकला. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत भारतीय संघाचे आगळेवेगळे अभिनंदन केले.

भारतीय क्रिकेट संघाने आशिया चषकात सलग तिसऱ्यांदा पाकिस्तानवर विजय मिळवत एक नवा विक्रम प्रस्थापित केला. याबद्दल पंतप्रधान मोदींनी एक्सवर पोस्ट केली. 'ऑपरेशन सिंदूर असो किंवा खेळाचे मैदान निकाल एकच. तो म्हणजे भारताचा विजय' अशा शब्दांत पंतप्रधानांनी भारतीय संघाचे अभिनंदन आणि पाकिस्तानला टोला लगावला.

आशिया चषकातील भारत-पाकिस्तान सामन्यावरून भारतात मोठा गजहब उडाला होता. पहलगामचा हल्ला, ऑपरेशन सिंदूर या पार्श्वभूमीवर पाकिस्तानबरोबर खेळणे योग्य नाही, अशी टीका विरोधकांकडून करण्यात आली. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह असल्यामुळे भाजपला लक्ष्य करण्यात आले, परंतु तिन्ही सामन्यात भारताने पाकिस्तानला पराभवाची धूळ चारली आणि जेतेपद मिळवले.



### देशाचा नेता फ्रंटफुटवर खेळल्यावर आत्मविश्वास वाढतो -सूर्यकुमार

आशिया कपच्या अंतिम फेरीत भारताने पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या विजयाला ऑपरेशन सिंदूरशी जोडून शुभेच्छा दिल्या होत्या. त्यावर टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादवनेही जोरदार प्रतिक्रिया दिली. 'एएनआय'ला दिलेल्या मुलाखतीत तो म्हणाला, जेव्हा देशाचा नेता स्वतः फ्रंटफुटवर फलंदाजी करतो, तेव्हा खेळाडूंचा आत्मविश्वास अधिक वाढतो.

# प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेत रायगडचा समावेश

**महाड : प्रतिनिधी**

औद्योगिकीकरणाच्या जोडीला कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने राबविलेल्या प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेत रायगड जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. महाड येथील पीजी रेजन्सी हॉटेलमध्ये सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत खासदार सुनील तटकरे यांनी ही माहिती दिली.



रायगडसह देशातील १०० जिल्हे या योजनेत निवडण्यात आले असून, या निर्णयामुळे अल्पभूधारक व गोरगरिब शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. उत्पादनवाढीसोबतच शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढेल, असा विश्वास खासदारांनी यानिमित्ताने व्यक्त केला. या प्रसंगी माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप सह मान्यवर उपस्थित होते.

योजनेच्या निवडीसाठी कमी उत्पादन, कमी लागवड क्षेत्र आणि अपुऱ्या कृषी पतपुरवठ्याचे प्रमाण हे निकष विचारात घेण्यात आले आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील भात, रब्बी पिके, भाजीपाला आणि फळबाग लागवडीला चालना मिळणार आहे. उत्पादनवाढीसाठी आधुनिक बियाणे, सिंचन सोयी, तंत्रज्ञान व मोफत मार्गदर्शन शेतकऱ्यांना उपलब्ध होईल, असे खासदार तटकरे यांनी स्पष्ट केले.

नवीन धान्य गोदामांची निर्मिती. शेतमालाच्या विक्रीत अडचणी येऊ नयेत म्हणून जिल्ह्यात नवी धान्य गोदामे उभारली जाणार आहेत, तसेच सहकारी संस्था व बँकांच्या माध्यमातून शून्य टक्के व्याजदराने कर्जपुरवठा देखील होणार आहे.या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर समित्या कार्यरत होणार असून, जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतील.

रायगड जिल्ह्याच्या उत्तरेत पनवेल, उरण, जेएनपीटीसारखे औद्योगिक प्रकल्प उभे राहिले आहेत. मात्र, महाड, श्रीवर्धन, खालापूर आणि कर्जत या तालुक्यांत शेतीवर आधारित अर्थव्यवस्था आहे. त्या भागातील शेतकऱ्यांना या योजनेचा विशेष लाभ होईल. औद्योगिकीकरणाच्या बरोबरीने कृषी क्षेत्राला नवसंजीवनी देणे हा योजनेचा उद्देश असल्याचे खासदार तटकरे यांनी नमूद केले.

### भाताचे कोठार ओळख पुन्हा मिळवून देणार

कोकणासह रायगड जिल्हा भात उत्पादनासाठी प्रसिद्ध असून, 'भाताचे कोठार' अशी ओळख असणाऱ्या या जिल्ह्याला पुन्हा नव्याने ही ओळख मिळवून देण्यासाठी जास्तीत जास्त शेती सिंचनाखाली आणणे हा या योजनेचा मुख्य हेतू असल्याचे खासदारांनी सांगितले. यासाठी भातपिकाच्या किमान आधारभूत किमतीत दरवर्षी वाढ करण्यात येत असून शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्च व विक्री उत्पन्नातील तफावत कमी करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. पंतप्रधान धनधान्य कृषी योजनेत रायगडचा समावेश करून दीर्घकाळ प्रलंबित मागणी पूर्ण केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचे या परिषदेतून तटकरे यांनी मनःपूर्वक आभार मानले.

# खालापूरच्या शेणगाव येथील कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**खोपोली : प्रतिनिधी**

भाजपवर विश्वास ठेऊन पक्षप्रवेश करत शेणगावमध्ये भाजपाची ताकत वाढविणाऱ्या या कार्यकर्त्यांना न्याय देत भविष्यात त्यांना पक्षाकडून बळ देण्याचे काम करू अशी ग्वाही भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांनी राष्ट्रवादी मधून भाजपमध्ये पक्ष प्रवेश करणाऱ्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना दिली आहे.

शेणगाव परिसरातील युवा नेतृत्व तालुका उपाध्यक्ष प्रसाद देशमुख आणि उपाध्यक्ष विकास रसाळ यांच्या प्रयत्नातून आणि भास्कर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शेणगाव मधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये पक्षप्रवेश केला आहे.

यावेळी भास्कर देशमुख, ओमकार देशमुख, स्वराज देशमुख, राजेंद्र देशमूख, दत्तात्रेय देशमूख, विकास देशमूख, नारायण देशमुख, सचिन देशमुख, समीर देशमुख, वैभव देशमुख यांनी पक्ष प्रवेश केला. या प्रवेशकर्त्यांचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले. यावेळी भाजपचे खालापूर पूर्व मंडळ अध्यक्षसनी यादव, युवा मोर्च्या उपाध्यक्षनागेश पाटील, तालुका उपाध्यक्ष विकास रसाळ,प्रसाद देशमुख,मयूर पाटील, पंचायत समिती विभागीय अध्यक्ष लवेश कर्णुक, युवामोर्चा कोषाध्यक्ष महेश कडू, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# मासेमारीकरिता समुद्रात जाऊ नये; मत्स्यव्यवसाय विभागाचा इशारा

**मुरुड : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने गेले दोन दिवस तुफानी वाऱ्यांसह पाऊस धो धो पडत असल्याने ऐन नवरात्रौत्सवात जनजीवन विस्कळित झाले असून बाजारपेठ ठप्प झाली आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळेदोन दिवसांत ९७ मिमि नोंद झाली आसुन.आतापर्यंत २५२६ मिमि पावासाची नोंद झाली अशि माहिती मुरूड तहसीलदार कार्यालयातून देण्यात आली आहे.

राज्यात नवरात्रौत्सव सुरू आहे तरुणांमध्ये उदंड उत्साह आणि आनंदाचा वातावरण असते रोज रात्री भजन, गरबा दांडिया, सांस्कृतिक कार्यक्रम होत असतात परंतु पावासाने सर्व बट्ट्याबोळ करुन टाकल्याने भक्तगणांचा व तरुणांचा हिरमोड झालेला पाहायला मिळत आहे.

भारतीय हवामान विभागाकडून महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर पुढील २४ तासांसाठी हवामान विषयक इशारा प्राप्त झालेला आहे. त्यानुसार येत्या २४ तासात किनारपट्टीलगतच्या जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्याच्या किनारपट्टीलगत ४९ ते ५० किमी प्रति तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून वाऱ्याचा हा वेग ६० किमी प्रतितास एवढा वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व बंदरांवर स्थानिक सावधानतेचा इशारा देण्यात आलेला असून सर्व मच्छीमार सहकारी सोसायटीना तसेच व्हॉटस प मेसेज व्दारे ही कळविण्यात आले आहे की मच्छीमारांनी मासेमारीसाठी समुद्रात जाऊ नये असे आवाहन मुरुड परवाना मत्स्यव्यवसाय विभाग अधिकारी-अक्षय साळुंखे यांनी केले आहे. संयंकाळ दरम्यान खूप जोरदार वारे वाहत होते त्यामुळे मासेमारी करणे अश्यक बाब बनली होती. आज सुद्धा सकाळ पासून पाऊस मुरुड तालुक्यात पडत होता.त्यामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले होते.

भात शेतीसाठी पाऊस खूप आवश्यक होता परंतु अती पाऊस सुधा भात पिकाला घातक ठरू शकतो.यासाठी या पुढे पाऊस थांबणे खूप आवश्यक असल्याचे मत शेतकरी वर्गाने व्यक्त केली आहे.





# मुसळधार पावसामुळे शेतकऱ्याचे घर उद्ध्वस्त

**नेरळ : प्रतिनिधी**


कर्जत तालुक्यात मुसळधार पावसाने शेतकरी आणि सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत झाले असून शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असताना नेरळ जवळील कोदिवले येथील शेतकरी अमर मिसळ यांचे मध्यरात्री घर कोसळल्याची घटना घडली आहे.

सततधार पावसामुळे घराला मोठे तडे गेले होते. घराच्या कडेला असलेली जमीन धसल्याने घराचा किचन भाग मुख्य घरापासून वेगळा झाला आणि तो कोसळण्याच्या स्थितीत होता. मध्यरात्री भिंतीचा मोठा आवाज झाल्याने घरातील मंडळी जागी झाली. नागरिकांच्या वेळीच सतर्कतेमुळे घरातील वस्तू बाहेर काढण्यात आल्या, त्यामुळे मोठा अनर्थ टळला शिवाय सामानाची हानी होण्यापासून रोखण्यात आली, मात्र या घटनेनंतर शेतकरी मिसाळ कुटुंबाचे घर मोठ्या प्रमाणात उद्धुस्त झाले आहे.घर कोसळल्याने संकटाचा डोंगर कोसळला आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वेबसाईट डेव्हलपमेंट स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवार दिनांक २९ सप्टेंबर रोजी संगणक विभागातर्फे वेब इनोवेशन प्लॅटफॉर्म या संकल्पनेवर विद्यार्थ्यांसाठी वेबसाईट डेव्हलपमेंट स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत एकूण १८ विद्यार्थ्यांनी उस्फुर्त असा सहभाग घेतला होता.



या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वेबसाइट्समध्ये नवीन कल्पकता, डिजाईन कौशल्य व तांत्रिक ज्ञान यांचा सुरेख समन्वय दिसून आला. या स्पर्धेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर, सर्जनशीलता, आणि वास्तविक जीवनातील समस्यांचे वेब आधारित समाधान तयार करण्याची क्षमता विकसित करणे हा होता. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. प्रथमेश उदेकर, समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व प्रा. राजश्री म्हात्रे ( माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख) यांनी केले तसेच त्यांनी सर्व विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत चांगला अभिप्राय दिला.

या स्पर्धेचे विजेते प्रथम क्रमांक सलमान पटेल, द्वितीय क्रमांक सोनाली वर्मा, तृतीय क्रमांक गौरव गुप्ता आणि अम्मार खान, चतुर्थ क्रमांक हिमानी मोकल हे होते. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानात वाढ, समूहात कार्य करण्याची मानसिकता, आणि नवीन कल्पना मांडण्याची क्षमता विकसित झाली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल संगणक शास्त्र विभागाचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे आयोजन प्रा. रिजवान मोमीन (संगणक शास्त्र विभाग प्रमुख) यांनी केली तसेच संगणक शास्त्र विभागातील इतर सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतले नवी मुंबईतील देवींचे दर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी नवरात्रोत्सव मंडळांना भेटी देत देवींचे दर्शन घेतले. वाशी येथे बेलापुर विधानसभेचे जिल्हाप्रमुख किशोर पाटकर यांच्या मंडळाला भेट दिली. उपमुख्यमंत्री शिंदेंचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. शिंदेंनी किशोर पाटकर यांच्या मंडळाच्या देखाव्याचे, नऊ दिवस चालणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी खा. नरेश म्हस्के, जिल्हाप्रमुख किशोर पाटकर, माजी नगरसेविका दिव्या गायकवाड, वैभव गायकवाड, महेश परब यासह शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.



वाशी सेक्टर ९ येथील जय भवानी सार्वजनिक श्री नवरात्रोत्सव मंडळ हे नवी मुंबईत प्रसिद्ध आहे. यावेळी देवीच्या देखाव्यासाठी भव्य महाल उभारण्यात आला आहे. नऊ दिवस मंडळातर्फे विविध क्रीडा, संस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शिवाय सामाजिक आरोग्यविषयक कार्यक्रम देखील राबवले जातात.

# मिठाईत भेसळ करणाऱ्यांनो सावधान! सहा निरीक्षक रायगडात दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

सणासुदीच्या दिवसांत मिठाईत होणारी भेसळ रोखण्यासाठी रायगड जिल्हा अन्न व औषध प्रशासनातील रिक्त जागांवर सहा प्रशिक्षणार्थी औषध व अन्न निरिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर जप्त केलेल्या नमुन्यांची तत्काळ तपासणी करता यावी यासाठी पेणच्या रामवाडी येथे कोकण विभागीय प्रयोगशाळा सुरु केली जाणार आहे.



अन्न भेसळीचे प्रमाण ठाणे, रायगड, पालघर या जिल्ह्यामध्ये सर्वाधिक आहे. त्याच बरोबर या जिल्ह्यांमध्ये रासायनिक कारखान्यांची संख्या जास्त असली तरी येथे ६० टक्के पदे अद्याप रिक्त होती. ही पदे भरण्याबरोबरच कोकण विभागासाठी नवी प्रयोगशाळा सुरु करण्यात येत आहे. यामुळे भेसळ करणाऱ्यांवर निर्बंध येणार आहेत. गणेशोत्सव काळात केलेल्या अचानक तपासणीत, काही ठिकाणी मिठाई बनवण्यासाठी अखाद्य रंग आणि निकृष्ट दर्जाच्या पदार्थांचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकरणी अन्न सुरक्षा विभागाने तात्काळ कारवाई करत भेसळयुक्त मिठाईचे नमुने जप्त केले असून, पुढील तपासणीसाठी ते प्रयोगशाळेत पाठवले आहेत.

अन्न सुरक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, भेसळयुक्त मिठाईमुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अशा गैरप्रकारांना थारा दिला जाणार नाही. अन्न सुरक्षा विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, मिठाई खरेदी करताना दुकानाचा परवाना, मिठाईची गुणवत्ता आणि पॅकेजिंगवरील 'बेस्ट बिफोर' तारीख तपासावी. संशय आल्यास तात्काळ अन्न व औषध प्रशासन विभागाकडे तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले आहे..

**"**

**रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी अधिकारीच नाहीत. या स्थितीवर मात करण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासनामध्ये नव्याने भरती प्रक्रिया सुरु केली आहे. रायगड जिल्ह्यात अन्न निरीक्षकांची १२ पदे मंजूर आहेत, यातील दोनच पदे भरलेली होती. नव्याने सहा प्रशिक्षणार्थी निरिक्षकांची नेमणुक जिल्ह्यात झाली आहे. पेणजवळ रामवाडी येथे कोकण विभागीय प्रयोगशाळा सुरु करण्यासाठी जागेची निवड करण्यात आलेली आहे. कोकणातील सर्व जिल्ह्यांना सोयीच्या ठिकाणी प्रयोगशाळा सुरु झालेली असेल.**
**-नितीन मोहिते, सहआयुक्त, अन्न आणि औषध प्रशासन, रायगड**

पान १ वरुन

## विकसित भारत घडविण्यात युवाशक्तीचा सिंहाचा वाटा असेल

आशुतोष सिंग यांनी केंद्र सरकारच्या विविध योजनांबद्दल माहिती देत युवकांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. या वेळी प्रत्येक सहभागी महाविद्यालयाच्या कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवकांचा प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा मागोवा घेत विकसित भारत घडविण्याच्या प्रक्रियेत अथक परिश्रम घेऊन सहभागी होण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन महाविद्यालयाच्या एनएसएस कक्षाचे अध्यक्ष डॉ. राजेश येवले यांनी केले, तर सूत्रसंचालन एनएसएस विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील केले.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एनएसएसचे विभागीय संचालक अजय शिंदे, मुंबई विद्यापीठ एनएसएसचे संचालक सुशील शिंदे, कार्यक्रम अधिकारी रमेश देवकर, जिल्हा समन्वयक प्रा. मोकल, क्षेत्र समन्वयक डॉ. हिंगमिरे यांचे विशेष सहकार्य लाभले, तर प्राचार्य डॉ. यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल डॉ. रमाकांत नवघरे, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे अध्यक्ष डॉ. शैलेश वाजेकर, एनएसएस विभागाचे अध्यक्ष डॉ. येवले, मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. आलोक भानुशाली, प्रा. सुशील घाडगे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. भाग्यश्री भोईर, एनएसएस विषय शिक्षक प्रा. रूपेश माने आणि स्वयंसेवक-स्वयंसेविका आर्दीनी परिश्रम घेतले.

## नागोठण्यात घरफोडी
### रिकाम्या फ्लॅटमुळे चोरट्यांचा प्रयत्न फसला

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे हायवेनाका जवळील बँक ऑफ इंडियाची शाखा असलेली सुमन आपार्टमेंट या इमारतीच्या मधील तीन फ्लॅट अज्ञात चोरट्यांनी रविवारी ( दि. २८) रात्री फोडले आहेत परंतु फ्लॅट मधील कोणत्याही प्रकारचे ऐवज लंपास झाले नसल्याची माहिती फ्लॅट धारकांकडून मिळाली आहे. त्या फ्लॅट मध्ये कोणीही नव्हते म्हणून पुढील अनर्थ टळला. फ्लॅट मध्ये जर कोणी असते तर त्या अज्ञात चोरट्यांकडून त्यांना मारहाण देखील झाली असती तसेच त्या व्यक्तीच्या जीवितास धोका देखील निर्माण झाला असता तर त्याला जबाबदार कोण? असा सवाल नागोठणेकर नागरिकांकडून केला जात आहे.

याबाबतची तक्रार नागोठणे व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाशशेठ जैन, नागोठणे ग्रामपंचायतीचे माजी सदस्य अतुल काळेयांनी नागोठणे पोलीस स्टेशन मध्ये दिली आहे

# वाशीत रेल्वे सुरक्षा जवानांचा सन्मान



**नवी मुंबई (प्रतिनिधी) :-**

भाजपा, नवी मुंबईच्या वतीने हास्य क्लब जेष्ठ नागरिक सदस्य तसेच रेल्वे सुरक्षा बळातील जवानांचा सन्मान रविवारी माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत व युवा नेते निशांत भगत यांच्या हस्ते करण्यात आला.

सानपाडा पामबीच ठिकाणी पहाटे जॉगिंग करणारे जेष्ठ नागरिक तसेच हास्य क्लब सदस्य, वाशी रेल्वे स्टेशन येथे तैनात रेल्वे सुरक्षा जवान यांना सन्मानित करण्यात आले. सोनखार येथे भाजपा कार्यकर्ते आणि स्वच्छतादूत यांच्या संयुक्त श्रमदानातून दुर्लक्षित जागांची स्वच्छता करण्यात आली.

वनमंत्री गणेश नाईक यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने आयोजित अभिष्टचिंतन पंधरवड्यातील सेवाभावी उपक्रमात सदर कार्यक्रम घेण्यात आले.

# रेबीज दिनानिमित्त जनजागृती

## पनवेल महानगरपालिकेतर्फे सर्व केंद्रांमध्ये मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने जागतिक रेबीज दिनानिमित्त (२८ सप्टेंबर) नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

रेबीज हा एक जीवघेणा आजार असून तो कुत्रे, मांजरी, माकडे, वटवाघुळ आदी प्राण्यांच्या चावण्याने किंवा ओरखड्याने होऊ शकतो. भारतातील जवळपास ९५ टक्के रेबीजच्या घटनांमध्ये कुत्र्यांचा प्रमुख सहभाग आढळतो. जागतिक रेबीज दिनानिमित्त (२८ सप्टेंबर) नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्यादृष्टीने मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी व पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भगवान गीते यांच्या सूचनेनूसार सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये जनजागृती करण्यात आली . तसेच १०५ भटके श्वानांना व २५ भटके मांजरींना निर्बीजीकरण केंद्रामध्ये लसीकरण करण्यात आले. तसेच लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय पनवेल येथे विद्यार्थ्यांना रेबीज विषयी माहिती देण्यात आली. तसेच ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले पालिका शाळा८, शंकरराव चव्हाण विद्यालय , जिल्हा परिषद शाळा से.१४ कामोठे, ओवे जिल्हा परिषद शाळा खारघर,पालेखुर्द जिल्हा परिषद , सुधागड शाळ कळंबोली, मायनॉरिटी इंग्लिश स्कूल ,तळोजा मजकूर जिल्हा परिषद शाळा येथे रेबीज दिनाबद्दल रेबीज व लसीकरणाबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. पनवेल महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, रेबीज आजार टाळण्यासाठी काळजी घेणे, जागरूक राहणे आणि वेळेवर वैद्यकीय उपचार घेणे अत्यंत आवश्यक आहे.



### रेबीज होण्याची कारणे

संक्रमित प्राण्यांच्या संपर्कातून हा आजार पसरतो.
प्राण्यांच्या लाळेमुळे, ओरखड्यामुळे किंवा चाव्यामुळे संसर्ग होतो.
वेळेवर उपचार न झाल्यास आजार जीवघेणा ठरू शकतो.

**महत्त्वाची लक्षणे :**

१.ताप, डोकेदुखी, अशक्तपणा, चिंतेची भावना

२.दिर्घकाळ उपचार न केल्यास आक्रमक वर्तन भ्रम आणि भरपूर लाळ निर्माण होते.

३.व्हारयरस चेतासंस्थेत शिरल्यावरती मेंदू व मणक्यात सूज

४. रूग्ण हायपर होतो व त्यांना पाण्याची भिती वाटू लागते.

### प्रतिबंधक उपाययोजना

प्राण्याने चावल्यानंतर जखम तत्काळ साबण व स्वच्छ पाण्याने धुऊन घ्यावी. त्यावरती स्पिरीट किंवा अल्कोहोल किंवा घरगुती जंतूनाशकाचा वापर करा.
रेबीजविरोधी इंजेक्शन व लसीकरण वेळेवर घ्यावे.

# उरण तालुक्यात परतीच्या पावसाने भाताची पिके आडवी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्याला परतीच्या पावसाने झोडपले असून,अवघ्या दोन दिवसांच्या उसंतीनंतर रुद्ररूप धारण केलेल्या पावसाने सोसाट्याच्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे संपूर्ण तालुक्यातील हातातोंडांशी आलेली भाताची पिके आडवी होऊन पाण्याखाली गेली आहेत. सततच्या पावसामुळे तालुक्यातील नागरिकांचे जनजिवन पुरते विस्कळीत झाले आहे.एकेकाळी भाताचे कोठार म्हटल्या जाणाऱ्या उरण तालुक्यातील चिरनेर, मोठ्ठीजुई, कळंबूसरे, कोप्रोली,पाणदिवे, खोपटे,पिरकोन सारडे, वशेणी,पुनाडे, आवरे,पाले,गोवठणे,विंधणे बोरखार,मोठेभोम, धाकटीजूई, टाकीगाव,दिघोडे,नागाव व केगाव आदी महसूली गाव परिसरातील भातशेतीत अखेरच्या मुसळधार पाऊस आणि सुसाट्याच्या वादळीने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे.



या पावसाचा फटका बहुतांशी ठिकाणच्या भातशेतीला बसला आहे.गर्भातून बाहेर आलेले भाताच्या कणसाचे दाण्याचा भागच पिके आडवी होऊन पाण्याखाली आल्याने पावसाने उसंती न दिल्यास पाण्यात भातपीके कुजून जाण्याची भिती व्यक्त करण्यात येत आहे. पावसामुळे परिपक्व भात पिक जमिनीवर पडून त्याला पुन्हा कोंब येण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे मोठ्या मशागतीने लागवड करण्यात आलेल्या व न परवडणाऱ्या भातशेतीचे उत्पादन शेतकऱ्यांच्या हातातून जाण्याची वेळ येऊन ठेपली असल्याने येथील शेतकरी चिंतेत सापडला आहे.

# उलवे नोडमध्ये अभिनेते अशोक सराफ यांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आज जी काही माझी अभिनय क्षेत्रात वाटचाल सुरू आहे ती केवळ रसिकांमुळेच! रसिक प्रेक्षक माझे मायबाप आहेत. माझ्या आयुष्यात निवेदिता आली आणि आयुष्यच उजळून गेले. सर्वांनाच अशा बायका मिळतात असे नाही. मी रसिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचे काम प्रामाणिकपणे केले. मला महाराष्ट्राच्या जनतेने भरभरून प्रेम दिले. या पूर्वी माझे अनेक सत्कार झालेत, पण उलव्यातीलनागरी सत्कार मी आयुष्यभर विसरणार नाही. त्यामुळे महेंद्रशेठ घरत यांच्याही प्रेमात मी पडलोय, असे पद्मश्री आणि महाराष्ट्र भूषण पुरस्कारप्राप्त अशोक सराफ नागरी सत्काराला उत्तर देताना म्हणाले.



मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेते, अभिनयाचे बादशहा अशोक सराफ यांचा चाहत्यांच्या तुफान गर्दीत उलव्यातील मभूमिपुत्र भवनफ येथे रविवारी सपत्निक भव्य नागरी सत्कार सोहळा झाला संपन्न झाला. यावेळी नरेंद्र बेडेकर निर्मित मबहुरूपी अशोकफच्या मेजवानीने रसिक मंत्रमुग्ध झाले होते.

नागरी सत्कार समारंभ यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेने आयोजित केला होता. माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याला माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय गृहमंत्री आणि आंध्रप्रदेशचे माजी राज्यपाल सुशीलकुमार शिंदे, राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, रायगडचे खासदार सुनीलतटकरे, भाजपनेते तथा माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, शिवव्याख्याते प्रशांत देशमुख, साई मंदिरवहाळचे संस्थापक रविशेठ पाटील, शिवसेनेचे बबनदादा पाटील, मिलिंद पाडगावकर, माजी जिल्हापरिषद सदस्य रवींद्र पाटील, विनोद म्हात्रे, गोपाल पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

अशोक सराफ यांच्यावर प्रेम करणारे चाहत्यांनी तुफान गर्दी केल्याने भूमिपुत्र भवन खचाखच भरलेहोते. यावेळी अशोक मामांना रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात सलामी दिली. शेलघर येथील यमुना सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष महेंद्रशेठ घरत आणि सचिव शुभांगी घरत यांनी रायगड, नवी मुंबईच्या नागरिकांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन केले होते.

या सोहळ्यात रायगडचे खासदार सुनील तटकरे म्हणाले की, अशोक सराफ यांच्यासारखा कलाकार पुन्हा होणे नाही. त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कारमिळायला हवा. आम्हालाही राजकारणात रोज नवनवीन भूमिका कराव्या लागतात. अशा सर्व कलाकारमंडळींना एकत्र आणण्याचे काम महेंद्रशेठ घरत यांनी केले. ही किमया केवळ महेंद्रशेठ हेच करू शकतात.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, प्रत्येक माणसाला अभिमान वाटावा अशा प्रकारचेकाम अशोक सराफ यांनी केले आहे. प्रत्येकाच्या मनात त्यांच्यासाठी वेगळी जागा आहे. त्यामुळे तेशतायुषी व्हावेत, अशा त्यांनी शुभेच्छा दिल्या तसेच, महेंद्रशेठ माझा शिष्य नाही, तर भाऊ आहे. समाजकारणामध्ये राजकारण येऊ द्यायचं नसतं, हे तत्त्व आम्ही मानतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे म्हणाले की, अशोक सराफ यांनी महाराष्ट्रीयन जनतेला खळखळूनहसविले. रायगडसाठी लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे योगदान खूप मोठे आहे. रोखठोक बोलण्याची त्यांची नेहमी तयारी असायची. ज्यावेळी साडेबारा टक्के यांसाठी गोळीबार झाला, त्यावेळी तत्कालीनमुख्यमंत्र्यांनाही त्यांनी सोडले नाही. सांस्कृतिक मंत्री असताना मी चित्रपटसृष्टीसाठी खूप मोठे योगदान दिलेआहे. महेंद्र घरत गुणवत्ता असूनही राजकारणामध्ये थोडे मागे राहिले, त्यांना योग्य स्थान मिळायला हवे.

राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले की, अशोक सराफ यांचे चित्रपटसृष्टीसाठी योगदानखूप मोठे आहे. रसिकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवत ते आजही काम करत आहेत. निवेदिता सराफ यांचेअशोक सराफ यांच्या जीवनामध्ये खूप मोठे योगदान आहे. तसेच, महेंद्र घरत यांनी मनामध्ये ठरवले तरते काहीही करू शकतात. एकाच व्यासपीठावर अनेक पक्षांतील नेत्यांना एकत्र आणण्याचे काम तेच करू शकतात.







पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नवरात्रीच्या पवित्र पर्वावर रामशेठ ठाकूर यांनी उलवे येथे भारतीय जनता पक्ष, रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि जीवदानी उत्कर्ष मंडळ आयोजित नवरात्र उत्सव तसेच कळंबोली येथील शिवशंबो सामाजिक विकास मंडळआणि आदर्श सामाजिक संस्थेच्यावतीने आयोजित नवरात्र उत्सवांना भेट देऊन देवीचा आशीर्वाद घेतला. यावेळी त्यांनी मंडळाच्या कार्यकत्यांशी संवाद साधलाआणि नागरिकांना नवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी उपसरपंच अमरम्हात्रे, शरद खारकर, विजय घरत, भाजप गव्हाण जिल्हा परिषद अध्यक्ष निलेश खारकर, उपाध्यक्ष पनवेल पश्चिम मंडल शैलेश भगत, सुहास गोंधळी, भाजप नेते अमर म्हात्रे, दिपक गोंधळी, किशोर पाटील, अवधेश महतो, आर सी पिल्ले, शरद खारकर, संतोष तुडमे, नामदेवठाकूर,निलेश खोत,मनोज यादव,विकास सिंग, अवनीश सिंह, मनोज नाईक,विलास चंदेल, कृष्णा भाई आदी उपस्थित होते.

# जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेतर्फे पूरग्रस्त बांधवांना मदत उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत**

जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने पूरग्रस्त बांधवांसाठी आयोजित मदत संकलन उपक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन सर्वांनी शैक्षणिक साहित्य, अन्नधान्य आणि आवश्यक वस्तूंच्या स्वरूपात मदत करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

राज्यातील अनेक भागात आलेल्या पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. राज्य सरकार आणि प्रशासनाकडून मदतकार्य सुरू असले तरी सामाजिक संस्थाही यासंकटाच्या काळात पुढे सरसावत आहेत. याच पार्श्वभूमीवर पनवेलमधील भाजपनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेतर्फे पूरग्रस्त बांधवांना मदतीचे आवाहन केले आहे.



यामध्ये त्यांनी संस्थेच्या माध्यमातून शालेय साहित्य,वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिली, बॅग या वस्तू तसेच आवश्यक जीवनोपयोगी वस्तूदान करण्याचे आवाहन केले आहे. या उपक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेटदेऊन मदत करण्यासाठी सर्वांनी पुढे यावे असे आवाहन केले आहे. भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी नगरसेविका सुरेखा मोहोकर, रुपेश नागवेकर उपस्थित होते.

## पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत एक ६० वर्षीय बेवारस अनोळखी मयत इसम आढळून आहे. सदर इसमाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहे.

सदर इसमाचे रंग सावळा, उंची साडे ५ फुट २ इंच, चेहरा उभट, अंगाने सडपातळ, डोक्याचे व दाढीचे केस काळे पांढरे व वाढलेले, कपाल मोठे, नाक सरळ असा पेहराव आहे. सदर इसमाबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## इसम बेपत्ता

**पनवेल :** तक्का परिसरातून एक ४८ वर्षीय कोणास काही न सांगता घरातुन निघून गेल्याने तो बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. रिझवान अहमद असे या इसमाचे नाव असून त्याचे उंची ५ फूट ७ इंच, बांधा पातळ, रंग गोरा, चेहरा उभट, केस बारीक काळे, डोळे काळे, नाक सरळ, दाढी मिशी मध्यम, डोळ्यावर चष्मा, अंगात नेव्ही ब्लु लाल रंगाचा शर्ट, निळ्या रंगाची पॅन्ट घातलेली आहे. सदर इसमाबाबत काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा हवालदार देवेंद्र म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा.



**पनवेल : न्हावे ग्रामपंचायतीचे सदस्य सागर ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**

कळंबोली : शिवशंभो सामाजिक विकास मंडळ आयोजित नवरात्रोत्सवात बॉलीवूडमधील सुप्रसिद्ध गायक देव नेगी यांनी हजेरी लावली. त्यांनी आपल्या गाण्यांनी लोकांना मंत्रमुग्ध केले. पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते नेगी यांचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर नवभारत टाइम्स प्रिंट मिडियाच्या फिचर एडिटर रेखा रावत खान यादेखील उपस्थित होत्या. त्यांचेही स्वागत झाले. या वेळी भाजप कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, दिलीप बिस्ट आदी उपस्थित होते.





**पनवेल : उद्योजक राजू गुप्ते यांचा वाढदिवस सोमवारी साजरा झाला. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख उपस्थित होते.**

## संपादकीय

# पाकिस्तानचा कांगावा उघड

भारताचे परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांनी नुकतीच न्यूयॉर्क येथील संयुक्त राष्ट्र महासभेच्या अधिवेशनात भारताची बाजू ज्या जोरकसपणे मांडली, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच ठरेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या भारताच्या अत्यंत आत्मविश्वासपूर्ण वाटचालीचे पुरेपूर दर्शन जयशंकर यांच्या भाषणातून घडले असेच म्हणावे लागेल. या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर इंग्लिशमधून बोलताना ‘इंडिया’ऐवजी ‘भारत’ असा उल्लेख करीत भारताचा निर्णय स्वातंत्र्याचा मुद्दादेखील जयशंकर यांनी अधोरेखित केला.

**भारत अन्य कुठल्या देशाच्या प्रभावामुळे नव्हे तर स्वहित विचारात घेऊन स्वतंत्रपणे निर्णय घेतो हे परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांनी नुकतेच संयुक्त राष्ट्रांच्या आमसभा अधिवेशनात ठणकावून सांगितले. अलीकडच्या काही घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारताने असे म्हणणे हे भारताचा आत्मविश्वास नि:संदिग्धपणे अधोरेखित करते. या भाषणात जयशंकर यांनी पाकिस्तानचे नावही घेतले नाही, पण त्या देशावर जोरदार शाब्दिक हल्ला चढवला. गेल्या अनेक दशकांपासून जगातील मोठ्या दहशतवादी हल्ल्यांची मुळे त्याच देशाशी जोडलेली आहेत असे जयशंकर यांनी ठामपणे सांगितले. दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना त्याचा फटका बसेल असा गर्भित इशाराही जयशंकर यांनी दिला. स्वत:च्या हितसंबंधांमुळे अमेरिका तसेच काही पाश्चात्य देश पाकिस्तानच्या कारवायांकडे काणाडोळा करत आले आहेत हे खरे तर सर्वज्ञात आहे. त्यामुळेच पाकिस्तानविरोधात आपल्याला राजनैतिक पातळीवर अशाच आक्रमकतेने बाजू मांडावी लागणार आहे. आमसभेसारख्या व्यासपीठावर पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाझ शरीफ यांनी बिनदिक्कत खोटारडेपणा केला. पण पाकिस्तानचा खोटारडा कांगावा आपण यशस्वीरित्या चव्हाट्यावर आणला. त्यांच्या वक्तव्यांना ‘ऑपरेशन सिंदूर’ची पार्श्वभूमी असल्यामुळेच आपण त्यांना सडेतोड उत्तर दिले. कहर म्हणजे भारत-पाकिस्तानदरम्यानचे युद्ध अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी थांबवले, त्यामुळे नोबेल पारितोषिकासाठी त्यांना नामनिर्देशित करणे हे आपले कर्तव्य असल्याचे शरीफ म्हणाले. पण या दाव्यातील खोटारडेपणाचा संयुक्त राष्ट्रांमधील भारताचे प्रथम सचिव पेतल गेहलोत यांनी सुयोग्य समाचार घेतला व वास्तव जगासमोर ठेवले. संघर्ष थांबवा अशी याचना पाकिस्तानी लष्कराकडूनच भारतीय लष्कराकडे करण्यात आली होती याकडे त्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. या मंचावर पाकिस्तानची खरी फजिती घडवली ती मात्र जयशंकर यांनीच. त्यांनी भारताच्या ‘आत्मनिर्भरता’, ‘आत्मरक्षा’, आणि ‘आत्मविश्वास’ या परराष्ट्र धोरणाच्या तीन स्तंभांवर भर दिला. भारताची प्रगती त्यांनी जगासमोर ठेवली. तसेच बदलत्या जागतिक परिस्थितीकडे पाहण्याचा भारताचा दृष्टिकोन कसा आहे याचेही त्यांनी नेमके विवेचन केले. दहशतवादाबाबत भारताने घेतलेली कठोर भूमिका ही ‘आत्मरक्षे’शी संबंधित आहे याचे त्यांनी केलेले विवेचन पाकिस्तानशी झालेल्या भारताच्या संघर्षाकडे निर्देश करणारे होते. एप्रिल महिन्यात पहलगाममध्ये निष्पाप पर्यटकांची हत्या झाल्याचा उल्लेख करीत जयशंकर यांनी जगभरातील नेत्यांचे लक्ष पाकिस्तानच्या कुरापतींकडे वेधले. डोनाल्ड ट्रम्प गेले काही महिने सातत्याने रशियाकडून भारताने तेल विकत घेण्यास आक्षेप घेत आले असून त्याची शिक्षा म्हणून त्यांनी भारतावर ज्यादा आयातशुल्कही लादले आहे. या पार्श्वभूमीवर जयशंकर यांचे ‘आत्मनिर्भरता’, ‘आत्मरक्षा’, आणि ‘आत्मविश्वास’ या विषयीचे विवेचन या संदर्भातील भारताची भूमिका अतिशय उत्तमरित्या जगासमोर मांडते. संयुक्त राष्ट्रांची सध्याची स्थिती निराशाजनक असून शांततेच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रे अपेक्षेनुसार काम करू शकलेली नाहीत हे तर उघडच दिसते. हा मुद्दाही भारताने प्रभावीपणे मांडला हे योग्यच झाले.**

# भाविकांचे श्रद्धास्थान पाली येथील मरीमाता

रायगड जिल्ह्यातील अष्टविनायक तीर्थक्षेत्रापैकी एक असलेल्या बल्लाळेश्वराच्या तीर्थस्थानामुळे प्रसिद्ध असलेल्या पल्ली पुरात म्हणजेच पालीमध्ये सर्व धर्मीय, जात, पंथांच्या भक्तांच्या हाकेला धावून येणारी अन् त्यांची विघ्न दूर करणारी श्री मरीमाता आईचे देवस्थान सर्वांनाच हृदयस्थानी आहे. सर्वच भक्त मरीमातेच्या चरणी लीन होऊन जीवनात सुख, समृद्धी, आनंद मिळण्यासाठी देवीकडे साकड घालत असतात.

मरीमाता ही सर्वांना भरभरून आशीर्वाद देत असल्याने देवीवरचा श्रद्धेचा अन भक्तीचा फेरा तितकाच घट्ट होत जात आहे. या देवस्थानचे देखरेख व सेवा येथील सोनार समाजातील बांधव मोठ्या भक्तीभावाने गेले २५० वर्षापासून करीत आहेत. येथील समाजसेवक संजय घोसाळकर या मरीमाता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष आहेत. देवस्थानतर्फे मंदिरामध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल वर्षभर सुरू असते. मंदिराच्या सभागृहाचे काम देवस्थान ट्रस्टने हाती घेतले असून भक्तांकडून भरभरून हातभार लावण्याचे आवाहनही ट्रस्टमार्फत करण्यात आले आहे.

मरीमाता देवीची स्थापना १८५६मध्ये म्हणजे सुमारे २५० वर्षांपूर्वी करण्यात आल्याचे पूर्वजांकडून सांगण्यात आल्यानुसार समजते. गाव रचना ज्या वेळी करण्यात आली त्या काळी प्रत्येक समाजाच्या संख्येनुसार या पालीमध्ये विविध समाजाचे बांधव विसावले. त्यानुसार पालीची रचना ही प्रत्येक समाजाच्या आळीनुसार झाली आहे आणि त्यांनी आपल्या



हृदयस्थानी असणाऱ्या देवांची स्थापना ही तेव्हा केली.

पालीचे भौगोलिक व सामाजिक स्वरूप जात, धर्म, पंथ असे सर्वसमावेशक व एकात्मतेचे आहे. त्या काळी सोनार समाजाकडून या मरीमाता देवीची स्थापना करण्यात आली. प्रथम देवीचे छोटे मंदिर व आजूबाजूला मोकळा परिसर होता. या देवीची पूजाअर्चा व देखभाल व्हावी याकरिता पालीतील न्याती बंधू मोडक या महिला भगिनी या देवीच्या निसिम भक्त होत्या. त्यांनी त्या काळी देवीसाठी आपली बलाप येथील शेतजमीन व पालीतील राहत्या घराची जागाही दान केली. त्यातून मिळणाऱ्या वर्षभराच्या उत्पन्नातून देवीचा देखभाल खर्च केला जायचा. जसजसे देवीचे भक्त वाढू लागले तसा मंदिराची देखभाल करण्यासाठी १९५५मध्ये शासनाच्या नियमानुसार देवस्थानची ट्रस्टमध्ये नोंदणी करण्यात आली. त्या काळी ट्रस्टी म्हणून मोहरे, माहीमकर, पोवळे, पोतदार, म्हशीळकर या कुटुंबातील सदस्यांनी मोठा सहभाग घेऊन ट्रस्टची उभारणी चांगल्या पद्धतीने केली असल्याचे ट्रस्टचे माजी अध्यक्ष आणि सुरेश पोतदार यांनी सांगितले आहे. देवस्थानचा कारभार हा नंतर कै. प्रभाकर नारायण वेदक यांनी आपल्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळून चांगल्या पद्धतीत कार्यरत करून समाज बांधवांना संघटित केले. त्यानंतर देवस्थानचा कारभार सुरेश पोतदार यांनी हाती घेऊन देवस्थानला उर्जित अवस्था प्राप्त करून दिली व समाजातील तरुणांनाही देवस्थानच्या कामांमध्ये सहभाग घेऊन देवस्थानच्या कामाची धुरा ही तरुणवर्गाकडे दिली.

देवीचे वर्षभरात असणारे विविध सण, सांस्कृतिक कार्यक्रम याबाबत सर्व सविस्तर माहिती समाजातील ज्येष्ठ नागरिकांनी तरुण पिढीकडे वारसा हक्काने सुपूर्द केले. सद्यस्थितीत समाजातील पालीतील सोनार समाजातील तरुणवर्ग हा मोठ्या हिरीरिने मरीमाता देवीची चांगल्या पद्धतीने सेवा करून पूर्वजांनी घालून दिलेल्या रीतीरीवाज व धार्मिक असणारे संस्कार हे याथा सांग पार पडत असून यामध्ये अन्य समाजातील नागरिकांनाही तितक्याच मोठ्या श्रद्धेने सामावूनही घेतले जात आहेत .मरीमाता देवीच्या मंदिरात नवरात्र उत्सव मोठ्या धुमधडाक्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल करून पार पडला जातो. त्याचबरोबर होळी, गोकुळाष्टमीचाही सण मोठ्या भक्तीभावाने पालीतील सर्व समाजातील नागरिकांना बरोबर घेऊन चांगल्या रीतीने पार पाडले जातात.

माघी गणपतीची उत्सवातील आलेली पालखी ही मरीमाता देवस्थानच्या समोर थांबून देवीला मोठा मान दिला जातो तसेच देवळात देवस्थानच्या मंडळीकडून भजनही केले जाते. नवरात्र व गोकुळाष्टमीच्या कालावधीत सोनार समाजाचे भजन हे पूर्वी सुप्रसिद्ध होते. देवीच्या देवळात पाठही वाचला जायचा अन् आबालवृध्द महाभारतातील पट खेळायचे. मंदिरात सार्वजनिक गणेशोत्सवाचे आयोजनही केले जात होते, परंतु मध्यंतरीच्या काळात गणेश उत्सव हा स्थगित करण्यात आला. नवरात्रीमध्ये पुरुषांबरोबरच महिलांचाही सहभाग तितकाच मोठा असतो. देवीच्या देवळात हळदीकुंकू समारंभ ही तितक्याच श्रद्धेने व पारंपारिक रीतीरिवाजाप्रमाणे आयोजित करून त्यामध्ये सोनार समाजाबरोबरच अन्य समाजातील महिलांनाही हळदीकुंकवाला आमंत्रित केले जाते. सद्यस्थितीत देवस्थानचा कारभार संजय घोसाळकर, रविकांत घोसाळकर, प्रसाद म्हशिळकर, रोहन सुरावकर, सचिन दाभोळकर, गणेश मानकामे, निलेश नार्वेकर, कुमार मोहरे ही तरुण मंडळी कारभार उत्तम प्रकारे करीत आहेत अन् देवीची एक प्रकारे सेवाच करीत आहेत.

मरीमाता देवी हे आमचे श्रद्धास्थान असून आमच्या पूर्वजांनी आम्हाला दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार समाजाकडून देवीची सेवा करण्याची सुवर्णसंधी आम्हाला प्राप्त झाली आहे. देवीच्या मंदिराबाजूला असणाऱ्या सभागृहाचे कामकाज आम्ही तरुण मंडळींनी हाती घेतले असून समाजातील व अन्य समाजातील दानशूर व्यक्तींनी या सभागृहाच्या कामकाजाला आर्थिक हात लावून मंदिराच्या प्रगतीत सहकार्य करण्याचे आवाहन मरीमाता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजय घोसाळकर यांनी केले आहे.

**–दीपक घोसाळकर, कळंबोली**

# पाले येथील भवानी मातेचा नवरात्रोत्सव

रोहा तालुक्यातील मेढा पंचक्रोशीतील पाले या गावामध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही आई भवानी मातेचा नवरात्र उत्सव जल्लोषात, एकोप्याने आणि भक्तिभावाने साजरा करण्यात येत आहे. ‘आनंदाचे डोही आनंद तरंग’ या वातावरणात ग्रामस्थ, महिला मंडळ, तरुण मंडळ यांनी सामूहिक सहभाग नोंदवत आहेत. पौराणिक कथेनुसार देवी दुर्गेने महिषासुर राक्षसाचा वध करून वाईट प्रवृत्तीचा संहार केला, या स्मृती जागवणाऱ्या नवरात्र उत्सवात देवीच्या नऊ रूपांची भक्तीभावाने पूजा केली जात आहे.

पहिल्या दिवशी गावकऱ्यांनी विधीवत घट बसवून त्याला धान्य, पाने, फुलांची माळ अर्पण केली. नऊ दिवसांच्या उपवासात घटातील धान्य उगवून भक्तीभावाचे प्रतीक ठरले. खांडेकर



परिवाराची श्री कुलस्वामिनी माता दरवर्षीप्रमाणे प्रत्येक घरात घट बसवून भक्तांना लाभली.

नवरात्रीदरम्यान घराघरासमोर आणि मंदिरात रांगोळ्यांनी सजावट करण्यात येत आहे. सकाळ-संध्याकाळ आरती, सामुदायिक हरिपाठ, भजन, नामस्मरणाने गावभर भक्तिरस दरवळतो. महिला मंडळाने पारंपरिक गाणी, सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच गरबा नृत्याचे आयोजन करून उत्सवात रंग भरतात.

दसऱ्याच्या दिवशी महादेव मंदिरासमोरील दगडी स्तंभावर दीप प्रज्वलित करण्यात आला. हिंदू धर्माच्या परंपरेनुसार सोनं लुटण्याचा आनंद घेत ग्रामस्थांनी एकमेकांना राम राम म्हणत शुभेच्छा देतात. आई भवानी मातेच्या नवरात्र उत्सवामुळे गावात सुख, समाधान आणि शांततेचे वातावरण असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

**–जितेंद्र जाधव, धाटाव**



## बदलते तंत्रज्ञान

# वनप्लस १५ फोन लवकरच येणार; विविध वैशिष्ट्ये

हवाईमध्ये नुकत्याच झालेल्या स्नॅपड्रॅगन समिटमध्ये वनप्लसने अधिकृतपणे OnePlus १५ची घोषणा



केली आहे. हा क्वालकॉमचा नवीनतम फ्लॅगशिप चिपसेट -स्नॅपड्रॅगन ८ एलिट जेन ५ असलेला पहिला फोन असेल. वनप्लस कंपनीने म्हटले आहे की, हा कंपनीचा इन हाउस विकसित डिटेलमॅक्स इमेज इंजिन असलेला पहिला फोन असेल. तो प्रगत अल्गोरिदम आणि शक्तिशाली प्रोसेसर वापरून अशा प्रतिमा कॅप्चर करतो.

वनप्लसचा आगामी फ्लॅगशिप फोनमध्ये १६५ Hz रिफ्रेश रेट असलेला डिस्प्ले असेल. हा फोन पुढील महिन्यात म्हणजेच ऑक्टोबरमध्ये बाजारात येईल. या स्मार्टफोनची वैशिष्ट्ये लॉंचिंगपूर्वीच टीझर इमेजमधून लीक झाली आहेत. त्यानुसार हा स्मार्टफोन पंच-होल कटआउट डिस्प्लेसह येऊ शकतो. जर तुम्ही गेमिंगचे चाहते असाल तर तुम्हाला हा स्मार्टफोन नक्की आवडेल.

माहितीनुसार OnePlus १५चा डिस्प्ले १.५k रिझोल्यूशनला सपोर्ट करू शकतो. हायस्पीड परफॉर्मन्ससाठी त्यात स्नॅपड्रॅगन ८ एलिट जेन ५ चीपसेटदेखील असू शकतो. स्मार्टफोनमध्ये १६ जीबी रॅमदेखील असू शकतो आणि तो अँड्रॉइड १६ आउट ऑफ द बॉक्सला सपोर्ट करू शकतो.

OnePlus १५मध्ये मागील पॅनलवर ५० मेगापिक्सेलचा प्राथमिक कॅमेरा आहे तसंच १६ मेगापिक्सेल टेलिफोटो लेन्स आणि अल्ट्रा-वाइट कॅमेरा असू शकतो. या स्मार्टफोनमध्ये ३२ मेगापिक्सेल फ्रंट कॅमेरासह एक शार्प सेल्फी कॅमेरा असू शकतो.

वनप्लसने कायम त्यांच्या स्मार्टफोन्समध्ये मोठ्या बॅटरी दिल्या आहेत. लीक्सवरून असे दिसून आले आहे की, येणाऱ्या OnePlus १५मध्ये सुपरफास्ट चार्जिंगसह ७००० एमएएच बॅटरी असू शकते. फास्ट चार्जिंगसाठी ते १०० वॅट फास्ट चार्जिंगदेखील देऊ शकते. याव्यतिरिक्त स्मार्टफोन ५० वॅट वायरलेस चार्जिंगला सपोर्ट करेल. कनेक्टिव्हिटीसाठी ते वाय-फाय, ब्लुटूथ आणि ड्युअल सिम कार्ड स्लॉटला सपोर्ट करेल. चार्जिंगसाठी त्यात यूएसबी टाइप-सी पोर्टदेखील असेल.

# पार्श्वगायक शंतनू मुखर्जी ऊर्फ शान

गायक शानने संगीत क्षेत्रात दमदार एन्ट्री केली आणि मुसु मुसु हसी, देउ मला लै या गाण्याने तरुणांना अक्षरशः वेड लावले होते. हे तेव्हाचं गीत आहे जेव्हा लोक मोबाईलपेक्षा आपल्या माणसांना अधिक वेळ देत होते. शानने संगीत क्षेत्रात प्रवेश केला व आपल्या या पहिल्याच गाण्याने लाखो तरुणांच्या मनावर राज्य केले. शानचा जन्म ३० सप्टेंबर १९७२ रोजी मध्य प्रदेशातील खंडवा शहरात झाला. त्याचे पूर्ण नाव शंतनु मुखर्जी असे आहे. त्याचे बालपण वांद्रे येथील बहुसंख्य कॅथोलिक ख्रिश्चन असलेल्या भागात गेले.

तो बंगाली ब्राह्मण कुटुंबातील आहे. त्याचे वडील मानस मुखर्जी हे संगीतकार आणि गायक होते. त्याची आई, सोनाली मुखर्जी या गायिका होत्या. त्यांचे नुकतेच २० जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. शानचे आजोबा जहर मुखर्जी हे गीतकार होते. त्याला सागरिका नावाची एक मोठी बहीण आहे, जी एक गायिका आहे.

शानने वयाच्या पाचव्या वर्षी जिंगल्स गाण्यास सुरुवात केली होती, तेव्हा त्याला इतर मुलांसह माईकसमोर उभे केले गेले. जसजसा तो मोठा होत गेला तसतसा त्याचा आवाज कर्कश होत गेला. त्यामुळे त्याला माईकपासून दूर ठेवण्यात आले आणि शानची घोर निराशा झाली त्यानंतर त्याने पुन्हा कधीही माईक हातातघेणे टाळले होते. तो शान आता अशा काही भारतीय गायकांपैकी एक आहे



## निमित्त


ज्यांनी ब्लू, मायकल लर्न्स टू रॉक, मेल सी आणि समीरा सैद यांसारख्या आंतरराष्ट्रीय कलाकारांसोबत काम केले आहे.

शानचा इथपर्यंतचा प्रवास खरोखर प्रेरणादायी आहे. शान १४ वर्षांचा होता तेव्हा त्याने त्याचे वडील गमावले, ते तंबाखूच्या सेवनाने मरण पावले होते. वडिलांच्या निधनानंतर आईने गायिका म्हणून काम करायला सुरुवात केली. शानने शालेय शिक्षण वांद्रे येथील जेसुइट शाळेत झाले. त्यांनी गुलाम मुस्तफा खान यांच्याकडून संगीताचे प्रशिक्षण घेतले आहे. शानने गीतकार सुरेश वाडकर यांच्या आजीवासन म्युझिक अकादमीमध्ये संगीताचे धडे घेतले आहे, परंतु त्याची कामगिरी समाधानकारक नसल्याचे लक्षात आल्यानंतर, त्याने परीक्षा देणे टाळले आणि लाजिरवाणेपणामुळे पुन्हा तो वाडकरांच्या क्लासला आला नाही.

शानच्या गाण्यांचे आजही लाखो दिवाने आहेत. शानने आपल्या संगीताने रसिकांना मंत्रमुग्ध करत या इंडस्ट्रीत मोठे यश मिळवले आहे. संगीताचा वारसा लाभलेल्या घरात जन्मलेला असला तरी त्याला या क्षेत्रात येण्यासाठी वाटेत आलेल्या प्रत्येक संघर्षाचा सामना करावा लागला आहे. तरुणपणातच वडिलांचे आकस्मिक जाणे त्यानंतर एकट्या आईवर आलेली कुटुंबाची जबाबदारी अशाही बिकट परिस्थितीतून दिवस काढून शानने हे यश गाठले आहे. शानने त्याच्या संघर्षाच्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये, शिकवणीवर्ग घेतले, केबल टीव्ही पॉइंट्स विकले. त्याने डीटीपी सेवा देखील चालवली आहे. जेट एअरवेज, ईस्ट-वेस्ट एअरलाइन्स, इत्यादी क्लायंटसाठी लेआउट आणि प्रिंट मटेरिअल तयार करण्याचे कामदेखील शानने केले आहे.

शानने हिंदीतच नाही तर बंगाली, मराठी, आसामी, कन्नड, तेलुगु, तमिळ, गुजराती, मल्याळम व उर्दू भाषेतही गाणी गायली आहेत. तो एक अभिनेता, टेलिव्हीजन प्रस्तुतकर्ता व होस्ट आहे. त्याने सारेगमपा, सारेगमप लिटील चॅम्प्स, स्टार व्हॉईस ऑफ इंडिया आणि स्टार व्हॉईस ऑफ इंडिया २ हे शो होस्ट केले आहेत. तो सारेगमप लिटील चॅम्प्स २०१४-२०१५ व द व्हॉइस इंडिया किड्स २०१६मध्ये जज म्हणूनदेखील दिसला. शानने २००३मध्ये राधिका मुखर्जीसोबत लग्न केले. या जोडप्याला शुभ व सोहम अशी दोन मुले आहेत.

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# शांत झोपेसाठी स्लीप टुरिझमचा नवा ट्रेंड

रात्री अनेकादा एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर गेलं तरी झोप लागत नाही. खूप वेळ जागं राहावं लागतं. झोप प्रूण झाली नाही तर सकाळी उठायला त्रास होतो. आळस, थकवा जाणवतो. धकाधकीच्या जीवनात शांत झोप लागणं हे अत्यंत आवश्यक आहे, पण हल्ली प्रत्येकाचीच नीट झोप लागत नसल्याची



तक्रार असलेली पाहायला मिळते. आठ तासांची उत्तम झोप म्हणजे सध्या सुख मानलं जात. याचदरम्यान आता स्लीप टूरिझ्म हा एक नवा ट्रेंड उद्यास आला आहे. शांत झोपेसाठी लोक लांबचा प्रवास करत आहेत.

स्लीप टूरिझ्म म्हणजे अशा ठिकाणी प्रवास करायचा जिथे आपल्याला शांत झोप लागेल. यामध्ये झोप ही आपली प्राथमिकता आहे. पूर्वी हॉटेल्समध्ये फक्त आरामदायी बेड मिळत असत, परंतु आता संपूर्ण प्रवासाचा अनुभव हा तुमची झोप सुधारण्यासाठी डिझाईन केला आहे.

- आठवड्याभर छान झोप लागण्यास मदत होते.
- काही मेडिकल लीडेड प्रोग्राम असतात.
- झोपेला चालना देणाऱ्या स्पा ट्रीटमेंटस देतात.

**का वाढतोय ट्रेंड?**

लोक आधी आरोग्य हे फक्त आहार आणि फिटनेसपुरतं मर्यादित मानत असत, परंतु आता झोपेलाही तेवढेच महत्त्व दिलं जात आहे. लोकलसर्कलच्या ‘हाऊ इंडिया स्लीप्स’ सर्वेक्षणानुसार भारतातील ६१% लोक सहा तासांपेक्षा कमी झोप घेतात. अशा परिस्थितीत, स्लीप टुरिझ्म लोकांना तणावमुक्त करण्याची आणि स्वतःशी कनेक्ट होण्याची संधी देतं.

**भारतात कुठे अनुभवता येईल स्लीप टुरिझ्म?**

आनंदा इन द हिमालयाज, ऋषिकेश – योग निद्रा, शिरोधारा आणि मेडिटेशनसाठी प्रसिद्ध.

आत्मनन वेलनेस रिसॉर्ट, मुळशी – ‘रेस्ट अँड रिजुव्हेनेशन’ कार्यक्रम, जिथे योग आणि स्पा थेरपी तणाव कमी करण्यास मदत करते.

स्वास्वरा, गोकर्ण – टेक-फ्री लाईफस्टाईल, आयुर्वेद आणि माइंडफुलनेसचा संगम.

वन, डेहराडून – साऊंड हिलिंग, आयुर्वेदिक उपचार आणि जंगलासारख्या वास्तुकलेचा अनुभव.

चला तर मग तुम्हीही टूर अरेंज करा आणि सुखाची झोप घ्या.

# पोलादपुरात विविध विषयांवर आढावा बैठक

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील जनतेच्या विकासकामांतील अनागोंदीबाबतच्या भावना तीव्र आहे. लोकशाही राज्यात जनतेला अधिकारी आणि लोकप्रतिनिधी उत्तरदायी असल्याने जनतेच्या प्रश्नांना आणि जनतेने उघड केलेल्या भ्रष्टाचाराबाबत चौकशी करून उत्तर देण्याची जबाबदारी माझ्यासह सर्वांवरच आहे. या आढावा बैठकीमुळे तालुक्यातील बहुसंख्य जनतेने मांडलेल्या प्रश्नाबाबत समाधान झाले असेल, असे माझे म्हणणे नसून जेवढे प्रश्न विचारले त्यापेक्षाही अधिक प्रश्न निवेदनाद्वारे प्राप्त झाले असल्याने सर्व प्रश्नांची उत्तरे अधिकाऱ्यांनी संबंधितांना द्यावीत, अशी अपेक्षा रायगड लोकसभा मतदार संघाचे खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केली.



याप्रसंगी व्यासपिठावर खासदार तटकरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या स्नेहल जगताप, माजी राजिप विरोधीपक्ष नेते सुभाष निकम, माजी राजिप अध्यक्ष अपेक्षा कारेकर, जिल्हा प्रवक्ता धनंजय देशमुख, तालुकाअध्यक्ष विठोबा पार्टे, शहरअध्यक्ष अजित खेडेकर, महाडचे अध्यक्ष निलेश महाडीक, अनिल मालुसरे, नगरसेविका श्रावणी शहा व आशा गायकवाड तसेच चंद्रकांतबुवा जाधव, प्रांताधिकारी ओमासे, उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे, तहसिलदार कपिल घोरपडे आदी मान्यवर उपस्थित होते.

जलजीवन मिशनच्या योजना आजतागायत पूर्णत्वास गेल्या नसताना बिले काढून महिलांना पाण्यासाठी वणवण करण्यास भाग पाडल्याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरण्यात आले. या प्रश्नकर्त्यांना योग्य उत्तर देण्यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली.

पोलादपूर येथे सार्वजनिक बांधकाम विभागाने विश्रामगृहावर खर्च केल्यानंतर ती इमारत पाडून नव्याने इमारत बांधल्याची माहिती यावेळी उपस्थितांनी देताच खा.तटकरे यांनी स्ट्रक्चरल ऑडीटशिवाय सरकारी इमारती पाडता येत नाहीत, असे बांधकाम उपविभागाच्या अभियंत्यांना सुनावले.

पोलादपूर तालुक्यातील २०२१ मधील नैसर्गिक आपत्तीग्रस्तांबाबतच्या प्रश्नांना यावेळी साखर सुतारवाडी ग्रामस्थांनी वाचा फोडली खा.सुनील तटकरे यांनी संबंधितांना उत्तर आणि कार्यवाही करण्यासंदर्भात आदेश दिले.

## कर्जतमध्ये युवा मित्र मंडळाच्या रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या मंडळांमध्ये आघाडीवर राहून कर्यरत असलेल्या नेरळ मोहाचीवाडी येथील युवा मित्र मंडळ यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. युवा मित्र मंडळाच्या वतीने नवरात्रोत्सव मंडळ साजरा केला जात असून या मंडळाच्या वतीने सलग १७ व्या वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

नेरळ मोहांचीवाडी येथील युवा मित्र मंडळाच्या वतीने मोहाचीवाडी येथील श्री साईबाबा मंदिर संस्थान मध्ये रक्तदान शिबीर आयोजित केले होते. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, युवा मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, उपाध्यक्ष धनाजी डबरे, लक्ष्मण मिरकुटे, सचिव मंगेश भवारे,विवेक चव्हाण तसेच खजिनदार सूरज साळवी, यांच्या उपस्थित रक्तदान शिबिराचे उदघाटन करण्यात आले. रक्त संकलन माया ब्लड बँकेच्या श्वेता बागुल, प्रियांका धायके, आकांक्षा गोळे यांच्या पथकाने केले. या शिबिरात ३५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# माणगावमध्ये व्यायामशाळेचे उद्घाटन, अंतर्गत रस्त्याचे भूमिपूजन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्याच्या भुवन ग्रामपंचायत हद्दीतील विठ्ठलनगर येथे रायगड जिल्हा परिषद अलिबाग, जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या व्यायामशाळेचे उद्घाटन आणि राजिप इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण योजनेंर्तगत मंजूर झालेल्या अंतर्गत रस्त्याचे भूमिपूजन राज्याच्या महिला व बालविकासमंत्री



आदिती तटकरे यांच्या हस्ते आयोजित करण्यात आले

या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष शेखर देशमुख, तालुकाध्यक्ष काका नवगणे, भुवन ग्रामपंचायतीचे सरपंच दीपक जाधव, उपसरपंच दत्ताराम फराडे, इंदापूर उपसरपंच उदय अधिकारी, रातवड सरपंच सतीश पवार, ज्येष्ठ नेते शामराव येलकर, महेश महाजन, इंदापूर–कशेणे व्यापारी असोसिएशनचे मनोज जैन, उपाध्यक्ष समीर मेहता, गोविंद शिंदे यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी,कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ, महिला मंडळ आदी उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना मंत्री आदिती तटकरे यांनी गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रित येऊन काम केले तरच गावाचा सर्वांगीण सुंदर असा विकास होत असतो. विठ्ठलनगर येथील महिला कार्यशाळेसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देऊ.


## परिशिष्ट – १४
### उरण नगरपरिषद, उरण
### अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेचा नमुना (मराठी)
### अधिसूचना
### महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५

क्रमांक : नपप्र /कार्या –२ /स्था. स्व. सं. निवडणूक २०२५ / १७७८, दिनांक १३/०८/२०२५ राज्य शासनाने, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या मान्यतेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) (यापुढे अधिनियम म्हणून उल्लेखिलेला) चे कलम ९, १० व ३४१ ब अन्वये प्रारूप अधिसूचना क्र. असाधारण क्रमांक ९६ दिनांक १८ ऑगस्ट २०२५ च्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे उरण नगरपरिषद क्षेत्र जितक्या विभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित केल्यासंदर्भात प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा काळजीपूर्वक विचार करुन राज्य शासन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी, हे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या मान्यतेने, खालीलप्रमाणे अधिसूचित करीत आहेत :–

२. ज्याअर्थी, राज्य शासन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी, यांनी राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या मान्यतेने, महाराष्ट्र नगरपरिषद /नगरपंचायत अधिनियमांच्या कलम ९, १० व ३४१ ब च्या तरतूदीखाली उरण नगरपरिषद बाबतीत निवडावयाच्या सदस्यांची संख्या व प्रभागांची संख्या पुढीलप्रमाणे निश्चित केली आहे.

१. एकूण सदस्यांची संख्या – २१,
२. दोन सदस्यीय प्रभागांची संख्या – ९,
३. तीन सदस्यीय प्रभागांची संख्या – १,
४. एकूण प्रभागांची संख्या – १०,

३. त्याअर्थी, आता राज्य शासन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी, हे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या मान्यतेने, महाराष्ट्र नगरपरिषद /नगरपंचायत अधिनियमाचे कलम ९, १० व ३४१ ब अन्वये उक्त नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती या अधिसूचनेच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित करीत आहे.
४. या अधिसूचनेच्या तारखेच्या निकटच्या पुढील सार्वत्रिक निवडणूकीच्या प्रयोजनार्थ ही अधिसूचना अंमलात येईल.

**अनुसूची**

| प्रभाग क्रमांक व लोकसंख्या | प्रभागचे नाव, असल्यास | प्रभागाची व्याप्ती | निवडून द्यावयाच्या सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| प्रभाग क्र.१<br>लोकसंख्या<br>एकूण = २६०३<br>अ.जा.= ५८<br>अ.ज.= १७ | १ अ १ ब | **व्याप्ती –** मोरा पारशी अग्यारी, पारकर वाडी, ख्रिचन वाडी, साई बाबा मंदिर, राम मंदिर, मोरा एज्युकेशन सोसायटी स्कुल, मोहन स्टोअर गणपती मंदिर, वाल्मिकी नगर, फणसवाडी चाळ पर्यंत. | १ अ –१<br>१ ब – १<br>एकूण – २ |
| | | **उत्तर –** मोरा पारशी अग्यारी ते मोरा ख्रिश्चन वाडी ते मोरा बंदरा पर्यंत. | |
| | | **पूर्व –** मोरा साईबाबा मंदिर ते राम मंदिर ते मोहन स्टोअर्स ते करसनदास भिंडे यांचे घर ते श्रीकृष्ण मील ते बोरीपाखाडी सर्वे नंबर ११४,११५ ची पूर्व हद्द व ११७ ची भागशः पूर्व हद्दीपर्यंत. | |
| | | **दक्षिण –** सर्वे नं. ११७ चा पूर्वेकडील भाग ते फणसवाडी चाळ ते कोळी घर ते वाल्मिकी नगर पर्यंत | |
| | | **पश्चिम –** वाल्मिकी नगर मोरा पारशी अग्यारी पर्यंत नगरपरिषदेच्या हद्दीपयत. | |
| प्रभाग क्र.२<br>लोकसंख्या<br>एकूण = २७८४<br>अ.जा.= ५३०<br>अ.ज.= २३२ | २ अ २ ब | **व्याप्ती –** सिद्धार्थ नगर, रेल्वे बांध, बेलदार वाडा, दगडी खान, अजित वॉटर वर्क्स, भवरा मशीद, भवरा तलाव, हनुमान मंदिर, सॉल्ट ऑफिस, कातकरी वाडी, कस्टम चाळी पर्यंत. | २ अ –१<br>२ ब – १<br>एकूण – २ |
| | | **उत्तर –** सिद्धार्थ नगर ते सोनार चाळ क्र –१ ते बळीराम नामदेव तांडेल यांचे घर ते खारफुटी ते परशुराम मोतीराम कोळी ते लक्ष्मण उत्तम वाघ यांचे घरा पर्यंत. | |
| | | **पूर्व –** लक्ष्मण उत्तम वाघ यांचे घर ते सुरतवाला यांचे घर ते हनुमान मंदिर ते कस्टम चाळी पर्यंत. | |
| | | **दक्षिण –** कस्टम चाळ ते खंदारे यांचे घर (उरण मोरा रोड) ते पटवरी यांचे घर ते नगरपरिषद हद्द डोंगर भागापर्यंत. | |
| | | **पश्चिम –** पटवरी यांचे घर ते सिद्धार्थ नगर झोपडपट्टी ते नगरपरिषद हद्द डोंगर भागापर्यंत. | |
| प्रभाग क्र.३<br>लोकसंख्या<br>एकूण = २७९६<br>अ.जा.= २१४<br>अ.ज.= ४६ | ३ अ ३ ब | **व्याप्ती–** मांगीरदेव झोपडपट्टी, रेल्वे बांध, शेलार वाडी, एन .बी.सी.सी कॉलनी, नेव्ही पेट्रोल पम्प, आम्रपाली सोसायटी, आकांशा सोसायटी, माया विहार इमारत, बोरी दर्गा, बोरीगाव पार, डोंगर आळी पर्यंत. | ३ अ –१<br>३ ब – १<br>एकूण – २ |
| | | **उत्तर–** मांगीरदेव झोपडपट्टी ते उरण मोरा रोड ते भवरा मशीद ते अहमद अन्सारी यांचे घर ते रेल्वेबांध ते बाबूदुर्गान्ना यांचे घर ते कमलाकर पाटील यांचे घर ते मोरा रोड ते सर्वे नं. ९० ब च्या हद्दीपर्यंत. | |
| | | **पूर्व –** अहमद अन्सारी यांचे घर ते शेलार वाडी ते सर्वे नं. १२३ ते आम्रपाली इमारत ते आकांक्षा सोसायटी ते मायाविहार इमारत ते सर्वे नं. १४८ (रेल्वेबांध) ते मधुरिमा अपार्टमेंट उत्तर बाजू पर्यंत. | |
| | | **दक्षिण –** मधुरिमा अपार्टमेंट ते तारामती हरिचंद्र अपार्टमेंट ते रोहिदास गावंड यांचे घराचा दक्षिणेकडील भाग ते राजकुमार तिवारी यांचे गोडावून ते बोरीगाव रोड ते दिनानाथ पुरो यांचे घर डोंगरआळी. | |
| | | **पश्चिम –** दिनानाथ पुरो यांचे घर ते नितीन भोईर यांचे फार्म हाऊस ते रफिक शेख ते बाबू दुर्गान्ना यांचे घर ते मांगीरदेव झोपडपट्टी पर्यंत. | |
| प्रभाग क्र.४<br>लोकसंख्या<br>एकूण = २९७०<br>अ.जा.= १५०<br>अ.ज.= ४२ | ४ अ ४ ब | **व्याप्ती–** बोरीपाव भाट, बोरीगाव, बोरी पाटील आळी, रहाळकर मैदान, उरण एज्यूकेशन सोसायटी स्कुल, रोटरी स्कुल, कुंभार वाडा, उरण कोर्ट, इंदिरा गांधी हॉस्पिटल, उरण नगरपरिषद प्राथमिक शाळा इमारत, केगाव रोड चौक. | ४ अ –१<br>४ ब – १<br>एकूण – २ |
| | | **उत्तर –** श्रीमती. तारामती म्हात्रे ते श्री. मोडक यांचे घर ते दत्ताराम पेडणेकर यांचे घर ते मांगीरदेव मंदिर ते दत्ता साळुंखे यांचे घर ते मोरा रोड ते एकनाथ पाणसरे यांचे घरापर्यंत. | |
| | | **पूर्व –** एकनाथ पाणसरे यांचे घर ते आजम मुल्ला यांचे घर ते मयेकर इमारत ते केळकर यांचे दुकान ते क्लासिक पार्क पर्यंत. | |
| | | **दक्षिण –** क्लासिक पार्क इमारत ते अभिजित पाटील इमारत ते उरण नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र. १ ते कुंभारवाडा रोड ते केगाव चौक हद्दीपर्यंत. | |
| | | **पश्चिम –** केगाव चौक ते बोरी पाटील आळी रस्ता ते श्री.पाणसरे यांचे घर ते श्रीमती. तारामती म्हात्रे यांचे घर ते नगरपरिषद हद्दीपर्यंत . | |
| प्रभाग क्र.५<br>लोकसंख्या<br>एकूण = २८५४<br>अ.जा.= ७<br>अ.ज.= ११ | ५ अ ५ ब | **व्याप्ती –** धुळीवाडा, मशिद मोहल्ला, कोळीवाडा,धान्य गोडावुन, तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन, गुलाबचंद पारेख गल्ली,बाबरे हॉस्पिटल ते नास्की गल्ली. | ५ अ –१<br>५ ब – १<br>एकूण – २ |
| | | **उत्तर –** दादर नाला ते ओटावकर यांचे घर ते मशिद मोहल्ला ते धुळीवाडा पर्यंत. | |
| | | **पूर्व –** धुळीवाडा ते फारूख पटेल ते बापुजीदेव मंदिर, कोळीवाडा ते रॉनी कोळी यांचे घर ते धान्य गोडावून ते हमीद सोंडे दुकानापर्यंत | |
| | | दक्षिण – हमीद सोंडे दुकान ते भानुशाली दुकान ते प्रगती स्टोअर्स ते पडते यांची पिठाची गिरण ते शिंदे बिल्डींग पर्यंत. | |
| | | **पश्चिम –** शिंदे बिल्डींग ते सार्वजनिक स्वच्छता गृह ते परेश तेरडे इमारत ते माधुरी ज्वेलर्स इमारत ते नवरंगे इमारत ते अताउल्ला तुंगेकर यांचे घर ते मुकरी इमारत क्र. एक ते मुकरी इमारत क्र. दोन ते राठोड इमारत ते मेहता छापखाना ते बाबरे हॉस्पिटल ते सद्गुरु खानावळ ते दादरनाला पर्यंत. | |
| प्रभाग क्र.६<br>लोकसंख्या<br>एकूण = २५६४<br>अ.जा.= ४८६<br>अ.ज.= १७ | ६ अ ६ ब | **व्याप्ती –** बौध्दवाडा, कोद्राव, समाज मंदिर, मासळी मार्केट, भाजी मार्केट, डॉ. आंबेडकर उद्यान, सिटीझन हायस्कूल, पटेल ज्वेलर्स, यशवंत किराणा गल्ली. | ६ अ –१<br>६ ब – १<br>एकूण – २ |
| | | **उत्तर –** उत्तर चाणजे सर्वे नं. ९८ अ मधील यादव भोईर यांचे घर ते विलास पाटील ते जयराम पाटील यांचे घर ते महेश खंडू पाटील यांचे घरा पर्यंत. | |
| | | **पूर्व –** महेश खंडू पाटील यांचे घर ते नवनीत भोईर यांचे घर ते जगन्नाथ ना.भोईर यांचे घर ते सनी ऑटो गॅरेज ते साई–तिसाई इमारती पर्यंत. | |
| | | **दक्षिण –** साई – तिसाई इमारत ते राखे इमारत ते यशवंत किरणा स्टोअर्स ते पटेल ज्वेलर्स ते तुंगेकर बिल्डींग पर्यंत. | |
| | | **पश्चिम –** तुंगेकर बिल्डींग ते सिटीझन हायस्कूल ते मानस अपार्टमेंट ते बुबेरे आईस फॅक्ट्री ते गजानन पाटील इमारत ते यादव भोईर यांचे घरा पर्यंत. | |
| प्रभाग क्र.७<br>लोकसंख्या<br>एकूण = २६३१<br>अ.जा.= १७६<br>अ.ज.= २० | ७ अ ७ ब | **व्याप्ती –** राजपाल हॉटेल, उरण चर्च, डॉक्टर दहिफळे दवाखाना,जरीमरी मंदिर, नारायण रहाटे यांचे घर, कासम भाट झोपडपट्टी, पांडुरंग अपार्टमेंट, खोपटकर इमारत, बालई रोड, गोकुळधाम इमारत, लक्ष्मी बेकरी इत्यादी . | ७ अ –१<br>७ ब – १<br>एकूण – २ |
| | | **उत्तर –** राजपाल हॉटेल ते गांधी चौक ते डॉ. दहिफळे यांचा दवाखाना ते जरीमरी मंदिर ते नारायण रहाटे यांचे घरा पर्यंत . | |
| | | **पूर्व –** नारायण रहाटे यांचे घर ते निलेश भोईर यांचे घर ते श्रीराम समर्थ अपार्टमेंट ते पांडुरंग अपार्टमेंट ते खोपटकर यांच्या बंगल्या पर्यंत. | |
| | | **दक्षिण –** खोपटकर यांचा बंगला ते रमजान शेख बिल्डींग ते करंजा रोड ते गोकुळधाम इमारती पर्यंत. | |
| | | **पश्चिम –** गोकुळ धाम इमारत ते साई आकाश इमारत ते लक्ष्मी बेकरी ते राजपाल हॉटेल पर्यंत. | |
| प्रभाग क्र.८<br>लोकसंख्या<br>एकूण = २४६४<br>अ.जा.= ५२<br>अ.ज.= ६ | ८ अ ८ ब | **व्याप्ती –** राज आर्केड इमारत, नयन अपार्टमेंट, महात्मा गांधी पुतळा तेरापंथी हॉल, राम मंदिर, बाजारपेठ, होरीझन ईस्टेट, संतोष आईसक्रिम कोर्नर, सहयाद्री हॉटेल, देऊळ वाडी, दत्त मंदिर, श्रीमान बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल,स्वामी विवेकानंद चौक. | ८ अ –१<br>८ ब – १<br>एकूण – २ |
| | | **उत्तर –** राज आर्केड इमारत ते नयन अपार्टमेंट ते महात्मा गांधी पुतळा ते पानसरे इमारत ते तेरापंथी हॉल ते मेहता कॅटर्स ते अलहुसेन इमारत ते संजय पाटील इमारत ते पालू भिंडे दुकान ते महाराष्ट्र स्वीट्स ते कोठारी ज्वेलर्स इमारत ते मुकरी लॉन्ड्री पर्यंत. | |
| | | **पूर्व –** मुकरी लॉन्ड्री ते होरीझन ईस्टेट ते नेरेकर यांची इमारत ते करंजा रोड ते संतोष आईसक्रिम ते शिवंम अपार्टमेंट पर्यंत . | |
| | | **दक्षिण –**शिवंम अपार्टमेंट ते जाधव यांची इमारत ते सेंटमेरी स्कुल मैदान ते देऊळवाडी शंकर मंदिर पर्यंत. | |
| | | **पश्चिम –** देऊळवाडी शंकर मंदिर ते राजू कुशाबा पाटील यांचे घर ते दत्त मंदिर ते श्रीमान बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल ते स्वामी विवेकानंद चौक ते राज आर्केड इमारत. | |
| प्रभाग क्र.९<br>लोकसंख्या<br>एकूण = २७५०<br>अ.जा.= १३५<br>अ.ज.= ५१ | ९ अ ९ ब | **व्याप्ती –** वैष्णवी हॉटेल,पंचायत समिती कार्यालय, नगरपरिषद कार्यालय, पी. जे पाटील बंगला, सिद्धी विनायक सोसायटी, ओमकार कॉलनी, थळीवीरा, कुंभार वाडा, गोरामुल्ला प्रॉपर्टी. | ९ अ –१<br>९ ब – १<br>एकूण – २ |
| | | **उत्तर –** केगाव रोड कुंभारवाडा ते वैष्णवी हॉटेल पर्यंत. | |
| | | **पूर्व –** वैष्णवी हॉटेल ते विवेकानंद चौक ते पंचायत समिती कार्यालय ते नागाव रोड ते पी. जे पाटील यांचे घरापर्यंत . | |
| | | **दक्षिण –** पी.जे.पाटील यांचे घर ते सिध्दी विनायक सोसायटी ते ओमकार कॉलनी पर्यंत. | |
| | | **पश्चिम –** ओमकार कॉलनी ते थळी विरा ते कुंभारवाडा गोरामुल्ला प्रॉपर्टी पर्यंत. | |
| प्रभाग क्र.१०<br>लोकसंख्या<br>एकूण = ४२०४<br>अ.जा.= २५४<br>अ.ज.= १०० | १० अ १० ब<br>१० क | **व्याप्ती –** साने गुरुजी बालोद्यान, विमलां तलाव, कामठा, कामगार वसाहत, अयोध्या सोसायटी, करंजा रोड, साई किरण अपार्टमेंट, आनंद नगर, भिवंडीवाला गार्डन, गानू इमारत, बापूशेठ वाडी, येशिदेव, मंदिर एन. आय हायस्कूल. | १० अ –१<br>१० ब – १<br>१० क – १<br>एकूण – ३ |
| | | **उत्तर –** विवेकानंद चौक ते साने गुरुजी उद्यान ते विमला तलाव ते देऊळवाडी धर्मशाळा ते वत्सराज यांचे घर ते कामठा रोड ते जुनी कामगार वसाहत ते अयोध्या सोसायटी ते करंजा रोड सह्याद्री हॉटेल पासून पालवी हॉस्पिटल ते गरीब नवाज इमारत ते रुबिना अपार्टमेंट. | |
| | | **पूर्व –** रुबिना अपार्टमेंट ते पालवी हॉस्पिटल ते मदिना कॉम्प्लेक्स ते जुनी साई किरण सोसायटी. | |
| | | दक्षिण – जुनी साई किरण सोसायटी ते लिबर्टी पार्क नगरपरिषद हद्द ते मानेवाडी कामठा पर्यंत. | |
| | | **पश्चिम –** मानेवाडी कामठा ते भिवंडीवाला गार्डन ते गानू इमारत नागाव रोड येशिदेव मंदिर चौक ते एन. आय. हायस्कूल ते साने गुरुजी उद्यान ते स्वामी विवेकानंद चौक पर्यंत. | |

**टीप :–**
१. मराठी व इंग्रजी अधिसूचनेमध्ये प्रभागाच्या वर्णनामध्ये तफावत असल्यास नकाशामधील हद्दीनुसार वर्णन ग्राह्य धरण्यात येईल.
२. नगरपरिषद क्षेत्राच्या प्रभागांच्या सीमा दर्शविणारे नकाशे कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी नगरपरिषद कार्यालयात उपलब्ध राहतील.

ठिकाण : उरण
दिनांक : २९/०९/२०२५

**सही/–**
**(जीवन पाटील)**
मुख्याधिकारी उरण नगरपरिषद,उरण


(उर्वरीत जाहिरात पान ७ वर..)


## हरकत नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे **अशिल श्री. प्रमोद शंकर मुंबईकर, रा. पनवेल, जि. रायगड** यांनी खालील नमूद मिळकती संदर्भात सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांसोबत खरेदी विक्री करारनामा केलेला असून सदर मिळकती संदर्भात मोबदला रक्कम देखील सदर मिळकतीच्या विद्यमान मालकास साक्षीदारां समक्ष अदा केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| धामणी,<br>ता. पनवेल | २९/१ब | जिरायत ०.९८.३०<br>पो.ख. ०.३२.२०<br>**एकूण १.३०.५०** | १.५६ |

सदर वर वर्णनांकीत मिळकती संदर्भात आमचे अशिल **श्री. प्रमोद शंकर मुंबईकर** यांनी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक व सातबारा सदरी असलेल्या चाहू हिरु भस्मा, गोमा हिरु भस्मा, बाळू चांगू उर्फ चांग्या भस्मा, आंबी काळूराम वाघ, मंगळी रामा उर्फ सुकटया निरगुडा, पुजा शिमग्या उर्फ धर्मा खंडवी, मनीबाई उर्फ सुकरी चांगू भस्मा या हिस्सेदारांसोबत सदर मिळकत खरेदी करण्याबाबत साठेकरार व तत्सम करारनामे केलेले आहेत. तसेच सदर मिळकत आमचे अशिलांचे बिनशर्त ताबेकब्जामध्ये दिलेली आहेत. परिणामी सदर मिळकत आमचे अशिलांच्या विना तक्रार ताब्यामध्ये आहे. तसेच वर नमूद मिळकतीचा खरेदी–विक्रीचा मोबदला रक्कम आमचे अशिलांनी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक व सातबारा सदरी असलेल्या सह हिस्सेदारांना साक्षीदारांसमक्ष सदर व्यवहाराची संपूर्णपणे अदा केलेली आहे. असे असताना आमच्या अशिलांशी असलेला वर नमूद मिळकतीच्या संदर्भातला करारनामा डावलून अथवा भंग करुन सदर मिळकत परस्पर त्रयस्थ इसमांना विक्री करणार असल्याचे व त्याबाबतचा विक्रीचा करारनामा आमच्या अशिलांच्या अपरोक्ष करण्याचा प्रयत्न सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून करण्यात येत असल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे. सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये. अन्यथा आमचे अशिल सदर प्रकरणी दिवाणी फौजदारी कारवाई करतील. या उपरही सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचे खरेदीखत, बक्षिसपत्र, साठेकरार, वचन चिठ्ठी, सामंजस्य करार केल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त कायदेशीर हरकत असून असा कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २९/०९/२०२५

**सही/–**
**ॲड. विक्रांत वि. पाटील**
म्हात्रोळी, अलिबाग – रायगड
मो.नं. ८३२९४६१५४०/९४०३६५१४३६ /८८०५३२८६४६



मा.खंडारे साहेब

## पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर पनवेल

दि.चौ. अर्ज क्र.४६२/२०२५
नि–७/ड
पु.ता. ६/११/२०२५

१) श्रीमती. सायली संजय पवार, (पत्नी)
वय ५६ वर्षे, व्यवसाय – गृहीणी
२) श्रीमती सुहासिनी यशवंत पवार, (आई)
वय ८० वर्षे, व्यवसाय–
राहणार :– रूम नं. १०५, सी विंग,
''जिवन धारा'', प्लॉट नं./सर्व्हे नं.९/२,४६/०
गाव–देवद, ता. पनवेल, जि. रायगड.
} **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही

**जाहीर नोटीस**

आम्ही अर्जदार **श्रीमती. सायली संजय पवार,** वय ५६ वर्षे, व्यवसाय – गृहीणी, या **कै. संजय यशवंत पवार,** यांच्या पत्नी आहे. **२) त्यांची आई श्रीमती सुहासिनी यशवंत पवार,** वय ८० वर्ष, सर्व राहणार :– रूम नं. १०५, सी विंग, ''जिवन धारा'', प्लॉट नं./सर्व्हे नं./ २,४६/० गाव – देवद, ता. पनवेल, जि. रायगड. हे सर्व ह्या पत्यावर राहत आहे. मयत **कै. संजय यशवंत पवार** यांचे पनवेल या ठिकाणी **दि. ०३/१०/२०२१,** रोजी येथे राहत्या घरी निधन झाले. मयत **कै. संजय यशवंत पवार** यांच्या निधनाची नोंद पडवे ग्रामपंचायत, सिंधुदुर्ग येथे केलेली आहे. यांच्या अधिकाऱ्याची सही व शिक्का आहे. यांनी त्यांच्या मृत्युचा दाखला दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | पत्ता | किंमत |
|---|---|---|
| १) | रूम नं. १०५, सी विंग, ''जिवन धारा'', प्लॉट नं./सर्व्हे न.९/२,४६/० गाव–देवद, ता. पनवेल, जि. रायगड क्षेत्र. ३९.१९ स्वै. मि. कारपेट | रू. १२,४२,०००/– |

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळण्याकरीता अर्ज दिला आहे. यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे. कोर्टात सादर करावी. दिलेल्या मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास यांचे विनंती प्रमाणे वारस दाखला दिला जाईल व त्यांनतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि. २५/०९/२५ रोजी माझ्या सहीने व मे. कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

**सही/–**
व/क. लिपीक
दि.न्या. व स्तर
पनवेल – रायगड

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
सहा. अधिक्षक
दि.न्या. व स्तर
पनवेल – रायगड

# बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट

## नवी मुंबईत मनपा आरोग्य विभागापुढे आव्हान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपलिका कार्यक्षेञात नागरिकांना चागली आरोग्य सेवा देण्साठी ठिकठिकाणी क्लिनीक आणी हॉस्पीटल उभारली आहेत, मात्र, या ठिकाणी किती डॉक्टर बोगस आहेत ? याची नोंद सध्या नवी मुंबई मनपा आरोग्य विभागाकडे उपलब्ध नाही. सध्या जोरात पाऊस असून विविध आजाराने डोके वर काढले आहे. काही बोगस डॉक्टरांच्या चुकीच्या उपचाराने रूग्णांना जीवाला मुकावे लागु शकते, अशा बोगस डॉक्टर तपासणीची शोध मोहीम सुरू करण्याचे आव्हान नवी मुंबई मनपा आरोग्य विभागापुढे निर्माण झाले आहे.



नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात तुर्भे, तुर्भे नाका, महापे, ऐरोली, चिंचपाडा, इंदिरानगर , शिरवणे गाव, करावे गाव, कोपरखैरणे, घणसोली गाव सह नवी मुंबईतील विविध ठिकाणी तसेच ठाणे बेलापूर एमआयडीसी झोपडपट्टी मध्ये मोठया प्रमाणात बोगस डॉक्टर आपले दुकान थातून बसलेले असतात. नवी मुंबईतील अशा बोगस डॉक्टरकडे इंडियन मेडिकल असोसिएशन ( आय एम ए ) संघटनेचे दुर्लक्ष होत असल्याने अशा डॉक्टरांचे पुरते फावलेले आहे. आजारी रुग्ण अशा डॉक्टरांकडून उपचार घेत असल्याने त्यांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता जास्त असते.

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे मनपा प्रशासनास बंधनकारक असते. बोगस डिग्री किंवा संबधीत मेडिकल कौसीलमध्ये नोंदणी नसेल अशा डॉक्टरांना क्लिनीक किंवा रूग्णालयामध्ये प्रॅक्टिस करू शकत नाही. तरीही डॉक्टर व्यवसाय करत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याचे अधिकार

> **नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील खाजगी दवाखाने, प्रॅक्टिस करणारे डॉक्टर्स यांची नोंद मनपाकडे असते. शहरातील विविध ठिकाणी प्रॅक्टिस करणार्या डॉक्टर्सची माहिती घेणे सुरू आहे. बोगस डॉक्टर्स आढळतात कारवाई करण्यात येईल.**
>
> **-डॉ. प्रशांत जवादे , मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नवी मुंबई मनपा**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग याना आहे. नवी मुंबई मनपा नागरी आरोग्य केंद्र हद्दीतील नव्याने प्रॅक्टिस सुरू करणार्या संबंधित डॉक्टरची कागदपत्रे मनपाचा संबंधित डॉक्टर तपासणी करत असतो. संबंधित कागदपत्रे, डिग्री, कौन्सिल नोंद आदी बाबत संशय आल्यास त्याची माहिती स्थानिक पोलीस ठाण्यास कळविले जाते. त्यानंतर संबंधित पोलीस आणि मनपा वैद्यकीय अधिकारी त्या डॉक्टरच्या क्लिनिक ठिकाणी येऊन सर्व कागदपत्रे तपासतात. जर त्याची कागदपत्रे बोगस असल्याचे आढळून आल्यास डॉक्टर विरोधात एफ आय आर नोंद केली जाते. अशा सर्व बोगस डॉक्टर यांच्यावर ९० दिवसाच्या आत पोलिसानी गुन्हा दाखल करण्याची कायद्यात तरतूद आहे. मात्र अशा किती बोगस डॉक्टरवर गुन्हे दाखल होऊन त्यांना शिक्षा झाली ? हे एक गौडबंगालच आहे. आम्ही बोगस डॉक्टर तपासणी करायची त्यांच्यावर गुन्हे दाखल करायचे मात्र, त्यापुढील पोलीस तपास हा संशयास्पद असल्याने बोगस डॉक्टरच्या विरोधातील कारवाई थंडावली जाते असे एका निवृत्त आरोग्य अधिकारी यांनी सांगितले.



# उरण महाविद्यालयाच्या रेड रिबीन क्लबची क्षेत्रभेट

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत येणाऱ्या रेड रिबीन क्लब च्या वतीने इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय येथे क्षेत्रभेट आयोजित केली गेली.

या वेळी एचआयव्ही समुपदेशक महादेव पवार यांनी विद्यार्थ्यांना एच आय व्ही ची कारणे, करावयाच्या उपायोजना व होऊ नये यासाठी घ्यावयाची काळजी इत्यादी विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. टेक्निशियन तृप्ती परजने यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

एक क्षेत्र भेटीत रुग्णालयातील सर्व विभागांना भेटी देऊन विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. डॉ. अंकिता कदम (टीबी विभाग)डॉ. सुभाष डवले (नेत्र विभाग) डॉ. संतोष झापकर व नागनाथ दळवी (दंत विभाग) डॉ. विशाल पाटील व डॉ. राठोड (प्रयोगशाळा), तसेच प्रियंका कोळी (वैद्यकीय अधिकारी आयुष्य विभाग) व कृतिका म्हात्रे (आयुष विभाग) इत्यादींनी त्या त्या विभागाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांनी प्रसूती विभाग, स्त्री विभाग, पुरुष विभाग, ओपीडी, इंजेक्शन विभाग इत्यादी विभागाला भेट दिली व माहिती मिळवली. व सरकारी आरोग्य व्यवस्था समजून घेतली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे व वैद्यकीय अधिकारी डॉ.बाबासो काळेल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या क्षेत्रभेटीत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे व मोठ्या संख्येने एन,एस,एस च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

# सुनील सानप आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी



**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय जनता पार्टी, पदवीधर प्रकोष्ठ आणि शिक्षक आघाडी महाराष्ट्र राज्य तसेच आदर्श शैक्षणिक समूह संचलित नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने त्रिशताब्दीतून झळकलेली अहिल्यागाथा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात नवी मुंबईत राहणारे सेंट फ्रान्सिस डी'असीसी हायस्कूल, बोरिवली येथील शिक्षक सुनील सानप यांना आदर्श विद्यारत्न पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले.महाराष्ट्र राज्यातून ५१६ शिक्षकांनी नामांकनासाठीण अर्ज केले होते.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्याचे विधानसभा सभापती राम शिंदे होते. तसेच आ. प्रशांत पाटील ,प्रशांत कोल्हे साहेब,किशोर पाटील साहेब यांसारखे मान्यवरही यावेळी उपस्थित होते.

# गोवर्धनी मातेच्या मंदिरात हळदीकुंकू उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त बेलापूर येथील गोवर्धनी मातेच्या मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध भक्तिमय व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याचाच एक भाग म्हणून २७ सप्टेंबर रोजी आमदार मंदा म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली महिला भगिनींसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात होते. या विशेष उपक्रमाला परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



पारंपरिक पोशाखात सजलेल्या भगिनींनी गोवर्धनी मातेच्या चरणी नतमस्तक होत प्रार्थना केली. मंदिर परिसर फुलांची सजावट, रंगीबेरंगी रांगोळी व पारंपरिक वातावरणामुळे उत्सवी रंगात उजळून निघाला होता. सदर समारंभादरम्यान महिलांनी एकमेकींना हळदीकुंकवाचा मान देत सौभाग्य, आरोग्य, सुख-समृद्धी आणि कुटुंबाच्या मंगलकार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

आमदार मंदा म्हात्रे यांनी या प्रसंगी उपस्थित महिलांचे अभिनंदन व कौतुक केले. तसेच नवरात्रोत्सव हा स्त्रीशक्तीचा सन्मान आणि सामाजिक ऐक्याचा उत्सव असल्याचे सांगितले. त्या वेळी समाजसेविका नमिता म्हात्रे, स्वाती म्हात्रे, ज्योती पाटील, तेजस्वी म्हात्रे, जयश्री चित्रे, सुहासिनी नायडू, सुमित्रा पवार, सिमरन शर्मा, मीना ओझा, कांती भाभी, नयना म्हात्रे, दर्शना म्हात्रे तसेच महिला व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चाईल्ड केअर संस्थेतर्फे नवदुर्गांचा सन्मान



**उरण : बातमीदार**

चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड तर्फे अनेक वर्ष विविध उपक्रम राबवले जात आहेत.त्यातील दर वर्षी दिले जाणारे नवदुर्गा सम्मान हा एक उपक्रम संस्थेचे संस्थापक विकास कडू यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केला जातो.तसेच या वर्षी हि नवदुर्गा सन्मान रायगड २०२५ हा पुरस्कार रायगड जिल्हातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना देण्यात आले. कनिष्का नाईक(महिला पोलीस )टाकीगाव, उरण ,प्रा. अपूर्वा अनिल देसाई (योग शिक्षिका )महड रायगड, प्रतीक्षा सचिन चव्हाण(सामाजिक कार्य), शीतल शैलेश दर्णे (शालेय सेविका)केगांव उरण , करुणा ईश्वर ढोरे (समाजसेविका) पनवेल,कु. हदया सुदर्शन जाधव (गायिका )कळबूसरे उरण ,सीमा प्रमोद मोरे (संपादिका, पत्रकार )पोलादपूर, निकिता सुरेश पाटील (अभिनेत्री )बोकडवीरा उरण, डॉ.वनिता श्रीकांत पाटील (वैद्यकीय )बोकडवीरा, उरण. या नवदुर्गाचे यथोचित मानसन्मान करण्यात आला. तसेंच या प्रसंगी रायगड मध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा रायगड विशेष सन्मान पुरस्कार देऊन गुण गौरव करण्यात आले.प्रकाश ठाकूर निवेदक-धुतम उरण , सचिन किसन गावंड (शैक्षणिक क्षेत्र )पेण, भूषण दामोदर भोईर (नूत्य दिग्दर्शक )मोठी जुई उरण ,कु विनायक म्हात्रे (युट्युबर ) खारपाडा, पनवेल , उत्तमकुमार कडवे (गायक )करळ उरण, राजेश द्वारकानाथ ठाकूर (अभिनेता)भेंडखळ उरण ,हितेश अशोक म्हात्रे (निवेदक)जसखार उरण, कैलासराजे कमलाकर घरत (सामाजिक कार्य व पत्रकार )खारपाडा पेण, राजेश रामचंद्र चोघुले (सामाजिक कार्य), शिक्षक कुंडेगाव उरण ,विवेक गजानन केणी (गायक) चिरनेर उरण , रोशन घरत व भाग्यश्री घरत (अभिनय) खोपटे उरण , साहील कडू व परी कडू (संगीत /ब्लॉगर )सोनारी उरण , नितेश तांडेल व तेजस्वी तांडेल (युट्युबर )जसखार उरण यांचा रायगड विशेष सन्मान पुरस्कार २०२५ देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मिलिंद खारपाटील संपादक आवाज महामुंबई चैनल, डॉ राजू पाटोदकर सिने आभिनेते,शिवराज अनंत पार्टे माजी नगर सेवक पोलादपूर तसेच चाईल्ड केअर संस्थेचे हितचिंतक, पदाधिकारी, सदस्य आदी, उपस्थित होते.



# गुन्हेगारी नियंत्रणात सार्वजनिक दक्षता महत्त्वाची -अजयकुमार लांडगे

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई परिसरात वाढत्या गुन्हेगारी आणि सुरक्षितता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेल्या सामूहिक प्रयत्नांवर पोलिस आणि जनतेमध्ये जागरूकता याबाबत पनवेल तालुका पत्रकार एकत्रीकरण संस्थेच्या पत्रकारांनी नवी मुंबई पोलीस सह आयुक्त राष्ट्रपती पदक पुरस्कार प्राप्त दीपक साकोरे यांच्यासह गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांच्याशी संवाद साधला.

या वेळी पत्रकार विजय कडू, संजय कदम, केवल महाडिक, रवींद्र गायकवाड, राज भंडारी, विशाल रावसाहेब सावंत, अनिल कुरघोडे, शंकर वायदंडे,यांच्यासह पत्रकार उपस्थित होते.

या वेळी सहाय्यक पोलीस आयुक्त लांडगे यांनी नागरिकांना सतर्क आणि सावध राहण्याचे आवाहन केले, त्याचबरोबर चोरी आणि घरफोड्यांमध्ये वाढ झाल्याचेदेखील नमूद केले. विशेषतः रात्रीच्या वेळी, आणि सर्व दुकानदार आणि व्यवसाय मालकांना त्यांच्या आस्थापनांबाहेर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची जोरदार शिफारस केली आहे. योग्यरित्या कार्यरत सीसीटीव्ही यंत्रणा पोलिस तपासात महत्त्वाची साधने आहेत आणि त्या गुन्हेगारांना लवकर ओळखण्यास आणि पकडण्यास मदत करतात, असे अजयकुमार लांडगे यांनी पत्रकारांना माहिती देताना म्हणाले.

# पाऊसधारांमध्ये कविसंमेलन रंगले

**उरण : प्रतिनिधी**

रावे येथील काव्य दरबारचे सल्लागार अरुण धर्माजी पाटील यांच्या निवासस्थानी काव्य दरबार संस्थे मार्फत काल २८ सप्टेंबर रोजी नवरात्र उत्सवानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कवी संमेलनात,बाहेर पाऊसधारा बरसत असतांना, कवी संमेलनात मात्र काव्यधारांचा वर्षाव सुरू होता. कवी संमेलनाचे अध्यक्षस्थान रावे गावचे ज्येष्ठ नागरिक रामदास जानू पाटील यांनी भूषविले होते. तर इतिहासकार के.एम.मढवी यांची या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती.




प्रसिद्ध कवयित्री मीनल माळी यांच्या बहारदार सूत्रसंचलनात कवी संमेलनाचा कार्यक्रम रंगला. कवी संमेलनात हरिश्चंद्र माळी, के. एम. मढवी, मिनल माळी- अरुण द. म्हात्रे,भ. पो. म्हात्रे, अजय शिवकर, एस. एस. पाटील, रवींद्र मोकल, मनोज पाटील, तुळशीदास पाटील, नरेश म्हात्रे या कवींनी आपल्या उत्स्फूर्त कवितेतून सुंदर रचना सादर केल्या. शेवटी आयोजक अरुण धर्माजी पाटील पाटील यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.शेवटी या कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली.

# चिरनेर रांजणपाडा येथे साडेतीन शक्तीपीठांचा देखावा

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर रांजणपाडा येथे निर्मिती करण्यात आलेल्या शिवसेना प्रणित सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळाने नवरात्र उत्सवाची ३६ वर्षापूर्वी मुहूर्तमेढ रोवली आहे. मातृभूमी जगतमाता जगदंबा ही भारतीय संस्कृतीची श्रीमंती आहे. कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची तुळजाभवानी, महागडची रेणुका देवी, वणीची सप्तशृंगी देवी अशी साडेतीन शक्तीपीठे महाराष्ट्रात आहेत.

या महाराष्ट्रातील साडेतीन शक्ती पिठातील मातृभूमी जगतमाता जगदंबांचे एकत्रितपणे दर्शन व्हावे, त्याचबरोबर या साडेतीन शक्तीपीठांच्या महिम्याचा अनुभव येथील भक्तांना यावा, यासाठी चिरनेर रांजणपाडा येथील शिवसेना प्रणित सार्वजनिक नवरात्र



उत्सव मंडळाच्या वतीने या साडेतीन शक्तीपिठातील आदिमाया शक्तींच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. भक्तांना भुरळ घालणाऱ्या देवीच्या मंदिराच्या देखाव्यातून चार वेगवेगळ्या गाभाऱ्याच्या प्रतिकृती साकारण्यात आल्या आहेत.

त्याच्यात मन प्रसन्न करणाऱ्या आणि प्रत्येक भक्ताला भावणाऱ्या महाराष्ट्राच्या कुलस्वामी, आदिशक्तीच्या रूपांच्या मूर्ती बसविण्यात आल्या आहेत. या महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठातील कुलस्वामींचे दर्शन घेण्यासाठी उरण तालुक्यातील नव्हे तर पनवेल, नवी मुंबई, ठाणे, मुंबई येथील देवीच्या भक्तगणांची रीघ लागली आहे. चिरनेर येथील शिल्पप्रसाद कला केंद्राचे शिल्पकार प्रसाद गजानन चौलकर व त्यांचे पिताश्री ७३ वर्षीय जेष्ठ मूर्तिकार गजानन शांताराम चौलकर यांनी या आदिमातांच्या मूर्ती अगदी हुबेहूब साकारल्या आहेत.गव्हाण, उलवे नोड येथील श्री समर्थ आर्ट्स डेकोरेशनचे सजावटकार वैभव कोळी व चंद्रशेखर बनसोड यांनी देखाव्यातून आदिशक्तींच्या मंदिराची प्रतिकृती मोठ्या कलात्मकतेने साकारली आहे. नवरात्र उत्सवात देवीचा होम हवन, देवीचा जागर गोंधळ, दुर्गा मातेची महाआरती, महाप्रसाद आणि भंडाऱ्याची उधळण व भव्य मिरवणूक असे धार्मिक कार्यक्रम मंडळाकडून मोठ्या भक्तीभावाने केले जातात. मंडळाच्या पुरुष कार्यकर्त्यांबरोबर महिला कार्यकर्त्या देखील देवीच्या नवरात्र उत्सवात मोठे परिश्रम घेत आहेत.

## दुर्गामाता दौड (माळ आठवी)





**पनवेल : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानमार्फत पनवेलमध्ये दरवर्षी श्री दुर्गामाता दौड काढली जाते. सोमवारी पनवेलमध्ये चार ठिकाणी दौड काढण्यात आली. पहिली दौड ही या वर्षी देवद गावात काढण्यात आली.सनातन आश्रमापासून ही दौड सुरू करण्यात आली. नंतर गावदेवीच्या मंदिरात जाऊन देवीची आरती करण्यात आली आणि सुरवातीच्या ठिकाणी येऊन दौडीची सांगता करण्यात आली दुसरी. दौड ही करंजाडे गाव आणि सेक्टर भागात काढण्यात आली. करंजाडेमध्ये महादौड काढण्यात आली. तिसरी दौड ही डेरवली गावात काढण्यात आली. चौथी दौड ही या वर्षी प्रथमच चिखले गावात काढण्यात आली. पनवेलमध्ये रोज वेगवेगळ्या ठिकाणी ही दौड काढण्यात येते. ज्यांना कोणाला या दौडीमध्ये सामील व्हायचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी शुभम साळुंखे (९७०२७०६२६२) यांना संपर्क करावा.**

# परतीच्या पावसाने कर्जतमध्ये शेतीचे नुकसान



**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात पडणाऱ्या जोरदार पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान केले आहे. कापणीस आलेली भातशेती अक्षरशः भुईसपाट झाली असून शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे.

मुसळधार पाऊस पडल्यावर तालुक्यातील मुख्य उल्हास नदी पूर्ण क्षमतेने वाहत असून तिच्या दोन उपनद्या पोश्री व पेज या दुथडी भरून वाहत आहेत. नेरळजवळील उल्हास नदीवर दहिवली पुलाला पाणी लागत असल्याने हा मार्ग केव्हाही वाहतुकीसाठी बंद होण्याची शक्यता निर्माण होते. कळंब येथील पोही गावाजवळील स्मशानभूमीही नदीच्या पाण्यात बुडाली होती.

हवामान विभागाकडून रायगड जिल्ह्याला २८ सप्टेंबर रोजी रेड अलर्ट देण्यात आला होता, तर २९ सप्टेंबरला ऑरेंज अलर्ट आणि ३० सप्टेंबर रोजी यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. जिल्ह्यात ठिकठिकाणी पावसाने थैमान घातले असताना कर्जत तालुक्यात भातशेतीचे नुकसान केले आहे. कापणीला आलेले भात पीक पाण्यात वाकले आहे.

वारे, कळंब, गरूडपाडा, पोशिर, जामरुख, टेंभेरे, खांडस, गौरकामथ अशा भागात शेतकरी हतबल झाला आहे. भाताची कणसे पाण्यात वाकली, बांध फुटले, माती वाहून गेली. शेतकऱ्यांनी उचललेला मजुरी, बियाणे, रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा खर्च पाण्यात गेला. हल्ली शेती परवडत नाही. त्यात असा पाऊस म्हणजे अंतिम प्रहारच आहे, अशी व्यथा शेतकरी व्यक्त करत आहेत.

कळंब आणि वारे ग्रामपंचायत ग्रामस्थ व शेतकरी शशिकांत तुरे यांनी सांगितले, कळंब तसेच गरूडपाडा परिसरातील भातशेती अतिवृष्टीमुळे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. तलाठी व कृषी अधिकारी यांनी तत्काळ पंचनामे करून नुकसानभरपाई दिली पाहिजे.

पावसामुळे फक्त शेतकऱ्यांवरच नव्हे तर नवरात्र उत्सवावर विरजण पडले आहे. गावोगावी पाणी साचून दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. काही ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाला होता.

कर्जत तालुक्यातील शेतकरी उघड्यावर आले आहेत. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावला आहे. शासनाने तत्काळ नुकसानीचे पंचनामे करून मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

# शाकिब पालटेंच्या वक्तव्यामुळे नेरळमध्ये विहिंप, बजरंग दल आक्रमक



**नेरळ : प्रतिनिधी**

ममदापूर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शाकिब पालटे यांनी टीव्ही मीडियाला दिलेल्या मुलाखतीत हिंदू समाजाविरोधात ‘आक्षेपार्ह अशा शब्दांत हिणवले गेले. या विधानामुळे हिंदू समाज पेटून उठला असून परिसरात संतापाचा ज्वालामुखी उफाळला आहे. हिंदूंचा अपमान सहन करणार नाही, अशा घोषणांनी नेरळ दणाणून गेले आहे.

विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाने आक्रमक भूमिका घेतली असून शाकिब पालटे यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करून त्यांना रायगड जिल्ह्यातून तडीपार करण्याची मागणी पोलीस प्रशासनासमोर लावून धरली आहे.

सुकून एम्पायर हलाल या विशिष्ट धर्मासाठी बांधल्या जाणाऱ्या प्रकल्पावरून आधीच वातावरण तापलेले असताना पालटे यांच्या वादग्रस्त वक्तव्याने परिस्थिती अधिकच चिघळली आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या हिंदू समाजाच्या बैठकीत ॲड. अमोल सूर्यवंशी, शाम कडाव, साईनाथ श्रीखंडे, दीपक गायकवाड, नितीन पवाळी यांनी नेतृत्व करत स्पष्ट शब्दांत चेतावणी दिली की, हिंदूंचा अपमान सहन केला जाणार नाही, पालटे तडीपार न झाल्यास लोक रस्त्यावर उतरतील.

दरम्यान, गावागावातून तब्बल ५० हजार सह्यांची मोहीम उभारण्यात येत असून त्यावर आधारित निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांना देण्यात येणार आहे. केवळ निवेदनापुरतेच न थांबता गरज पडल्यास पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन उपोषण आणि जंगी मोर्चा काढण्याचा इशारा संघटनांनी दिला आहे.

# सततच्या पावसामुळे जिल्ह्यात भाजीपाल्याची आवक घटली, दरात मात्र वाढ

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे नाशिक, पुण्यासह विविध भागातील भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये भाज्यांची आवक घटली आहे. परिणामी भाज्यांचे दर २० ते २५ टक्क्यांनी वाढले आहेत.

मुसळधार पावसामुळे राज्यात अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली. मुंबईसह राज्याच्या अनेक भागात भाजीपाल्याचा पुरवठा करणाऱ्या नाशिकसह अन्य जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतात उभा असलेला भाजीपाला पाण्यात बुडाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यामुळे बाजार समित्यांमध्ये भाज्यांची आवक कमी झाली असून रायगड जिल्ह्यातील बाजारात भाजीपाला महागला आहे. नाशिक व पुणे परिसरातून येणाऱ्या पालेभाज्यांसह फळभाज्यांची आवक घटल्याने ग्राहकांना भाज्या खरेदी करणे महागात पडत आहे. भाजीपाल्याचे दर वाढल्याने ग्राहकांच्या खिशाला चाट बसली असून रोजचे बजेट कोलमडले.

(पान ५ वरुन..)

परिशिष्ट – १५

**Uran Municipal Council, Uran**

**अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेचा नमुना (इंग्रजी)**

## NOTIFICATION

**Maharashtra Municipal Council, Nagar Panchayat and Industrial Township Act, 1965**

No. : नपप्र /कार्या –२ /स्था. स्व. सं. निवडणूक २०२५ / १७७८,, Date 13.08.2025 The State Government with approval of State Election Commission, In exercise of the powers conferred by section 9, 10 & 341 B of The Maharashtra Municipal Council, Nagar Panchayat and Industrial Township Act, (Mah. Act No. XL of 1965) (hereinafter referred to as the "said Act") after carefully taking into consideration the objection & suggestion received, in response to the Draft Notification No. असाधारण क्रमांक ९६ dated 18 August 2025 fixing for the Uran Municipal Council. The number and the extent of the wards into which the said municipal area shall be divided is shown in the schedule to said Draft Notification. The State Government or its authorised officer, with the Approval of the State Election Commission, Maharashtra or its authorised officer, hereby makes the following Notification.

2. Whereas the State Government or its authorised officer with the Approval of the State Election Commission, Maharashtra or its authorised officer, as specified for Uran Municipal Council. under section 9 & 10 of the The Maharashtra Municipal Council, Nagar Panchayat and Industrial Township Act, 1965 the Number of Councillors to be elected and number of wards is as follows :-

1. Total number of councillors - 21,
2. Two councillors wards - 9,
3. Three councillors wards - 1,
4. Total wards - 10,

3. Now, therefore, in exercise of the powers under section 9, 10 & 341 B of the The Maharashtra Municipal Council, Nagar Panchayat and Industrial Township Act, 1965. The State Government or its authorised officer with the Approval of the State Election Commission, Maharashtra or its authorised officer hereby fix the number and extent of the wards into which the said Municipal Council, Nagar Panchayat area shall be divided as shown in the schedule to this Notification.

4. This Notification shall take effect for the purpose of the next general election held immediately following the date of this Notification.

### Schedule

| Ward Number and Population | Name of the Ward Number if any | Extended of Ward | Number Of Councilors To be Elected |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| **WARD 1**<br>Total Population 2603<br>SC Population-58<br>ST Population-17 | 1A, 1B | **Location-** Mora Parshi Agyari, Parkar Wadi, Khrichan Wadi, Sai Baba Temple, Ram Temple, Mora Education Society School, Mohan Store, Ganpati Temple, Valmiki Nagar, Fhanaswadi Chawl.<br>**North -** From Mora Parshi Agyari to Mora Christian Wadi to Mora Port.<br>**East -** From Mora Sai Baba Temple to Ram Temple to Mohan Stores to Karsandas Bhinde's house to Shrikrishna Mile to Boripakhadi Survey No. 114,115 to the eastern boundary and 117 to the eastern boundary.<br>**South -** Survey no From the eastern part of 117 to fhanswadi Chawl to Koli House to Valmiki Nagar<br>**West -** Valmiki Nagar to Mora Parshi Agyari to boundary of the Municipal Council. | 1A = 1<br>1B = 1<br>Total = 2 |
| **WARD 2**<br>Total Population 2784<br>SC Population-530<br>ST Population-232 | 2A, 2B | **Location-** Siddharth Nagar, Railway Bandh, Beldar Wada, Dagdi Khan, Ajit Water Works, Bhavra Masjid, Bhavra Lake, Hanuman Temple Salt, Office, Katkari Wadi, Custom Chawl<br>**North:** From Siddharth Nagar to Sonar Chawl No. 1 to Bliram Namdev Tandel house to Mangroves to Parashuram Motiram Koli to Laxman Uttam Wagh's house.<br>**East -** From Laxman Uttam Wagh's house to Suratwala's house to Hanuman temple to custom chawl<br>**South -** From Custom Chawl to Khandare's house (Uran Mora Road) to Patwari's house to Nagar Parishad boundary Dongarali boundary.<br>**West -** From Patwari's house to Siddharth Nagar slum to Nagarparishad area Dongarali boundary. | 2 A = 1<br>2 B = 1<br>Total = 2 |
| **WARD 3**<br>Total Population 2796<br>SC Population-214<br>ST Population-46 | 3A, 3B | **Location -** Mangirdev Slum, Railway Dam, Shelar Wadi, NBCC Colony, Navy Petrol Pump, Amrapali Society, Akansha Society, Maya Vihar Building, Bori Dargah, Borigaon Par, Dongar Ali.<br>**North -** Mangirdev slum to uran mora road to Bhavra mosque to Ahmad ansari House to Railway Bandh to babudurganna's house to Kamlakar Patil's house to Mora Road to Survey no. Up to 90B.<br>**East -** Ahmad Ansari house to Shelar Wadi to Survey no. 123 to Amrapali Building to Akanksha Society to Mayavihar Building to Survey no. 148 (Railway Bandh) to Madhurima Apartment's North side<br>**South -** Madhurima Apartment to Taramati Harishchandra Apartment to Rohidas Gawand House South Side to Raj kumar Tiwari Godown to Borigaon Road to Dinannath puro's House Dongarali.<br>**West -** From Dinanath Puro House to Nitin Bhoir Farm House to Rafiq Sheikh to Babu Durganna's House to Mangirdev Slum. | 3 A = 1<br>3 B = 1<br>Total = 2 |
| **WARD 4**<br>Total Population 2970<br>SC Population-150<br>ST Population-42 | 4A, 4B | **Location-** Boripav Bhat, Borigaon, Bori Patil Ali, Rahalkar Maidan, Uran Education Society School, Rotary School, Kumbhar Wada, Uran Court, Indira Gandhi Hospital, Uran Nagar Parishad Primary School Building, Kegaon Road Chowk.<br>**North -** Mrs. Taramati Mhatre to Shri. From Modak's house to Dattaram Pednekar's house to Mangirdev temple to Datta Salunkhe's house to Mora Road to Eknath Pansare's house.<br>**East -** From Eknath Pansare's house to Azam Mulla's house to Mayekar building to Kelkar's shop to Classic Park.<br>**South -** Classic Park Building to Abhijit Patil Building to Uran Nagar Parishad Primary School No. 1 to Kumbharwada Road to Kegaon Chowk boundary.<br>**West -** Kegaon Chowk to Bori Patil Ali Road to Mr. Pansare's house to Mrs. From Taramati Mhatre's house to Nagar Parishad boundary. | 4 A = 1<br>4 B = 1<br>Total = 2 |
| **WARD 5**<br>Total Population 2854<br>SC Population-7<br>ST Population-11 | 5A, 5B | **Location -** Dhuliwada, Mashid Mohalla, Koliwada, Dhanya Godavun, Tehsil Office, Police Station, Gulabchand Parekh Street, Babre Hospital to Naski Galli .<br>**North -** Dadar Nala to Otavkar's house to Mashid Mohalla to - Dhuliwada.<br>**East -** Dhuliwada to Farooq Patel to Bapujidev Temple, Koliwada to Ronnie Koli's house to Dhany Godavan to Hamid Sonde shop.<br>**South -** From Hamid Sonde Shop to Bhanushali Shop to Pragati Stores to Padte Flour Mill to Shinde Building.<br>**West -** Shinde Building to Public Urinals to Paresh Terde Building to Madhuri Jewelers Building to Navrange Building to Ataullah Tungekar's House to Mukri Building no. One to Mukri building no. Two to Rathod Building to Mehta Printing Press to Babre Hospital to Sadguru Khanawal to Dadar Nala. | 5 A = 1<br>5 B = 1<br>Total = 2 |
| **WARD 6**<br>Total Population 2564<br>SC Population-486<br>ST Population-17 | 6A, 6B | **Location**- Boudhwada, Kotgaon, Samaj Mandir, Fish Market, Vegetable Market, Dr. Ambedkar Udyan, Citizen High School, Patel Jewelers, Yashwant Kirana Galli<br>**North -** Chanje Survey No. From the house of Yadav Bhoir in 98A to the house of Vilas Patil to Jairam Patil to the house of Mahesh Khandu Patil.<br>**East -** From Mahesh Khandu Patil's house to Navneet Bhoir's house to Jagannath Na. Bhoir's house to Sunny Auto garage to Sai-Tisai building.<br>**South** - Sai-Tisai Building to Rakhe Building to Yashwant Kirana Stores to Patel Jewelers to Tungekar Building.<br>**West** - Tungekar Building to Citizen High School to Manas Apartment to Bubere Ice Factory to Gajanan Patil Building to Yadav Bhoir's house. | 6 A = 1<br>6 B = 1<br>Total = 2 |
| **WARD 7**<br>Total Population 2631<br>SC Population-176<br>ST Population-20 | 7A, 7B | **Location** - Rajpal Hotel, Uran Church, Doctor Dahiphale Dispensary, Jarimari Temple, Narayan Rahate's House, Kasam Bhat Slum, Pandurang Apartment, Khopatkar Building, Balai Road, Gokuldham Building, Lakshmi Bakery etc.<br>**North** - Rajpal Hotel to Gandhi Chowk to Dr. From Dahiphale's hospital to Jarimari temple to Narayan Rahate's house.<br>**East** - From Narayan Rahate's house to Nilesh Bhoir's house to Shriram Samarth apartment to Pandurang apartment to Khopatkar's bungalow.<br>**South** - Khopatkar's Bungalow to Ramzan Sheikh Building to Karanja Road to Gokuldham Building.<br>**West** - From Gokul Dham Building to Sai Akash Building to Lakshmi Bakery to Rajpal Hotel. | 7 A = 1<br>7 B = 1<br>Total = 2 |
| **WARD 8**<br>Total Population 2464<br>SC Population-52<br>ST Population-6 | 8A, 8B | **Location** - Raj Arcade Building, Nayan Apartment, Mahatma Gandhi Statue Terapanthi Hall, Ram Mandir, Bazarpeth, Horizon Estate, Santosh Ice Cream Corner, Sahyadri Hotel, Deul Wadi, Datta Mandir, Mr. Balasaheb Thackeray Sports Complex, Swami Vivekananda Chowk.<br>**North** - Raj Arcade Building to Nayan Apartment to Mahatma Gandhi Statue to Pansare Building Terapanthi Hall to Mehta Caterers to Alhusain Building to Sanjay Patil Building to Palu Bhinde Shop to Maharashtra Sweets to Kothari Jewelers Building to Mukri Laundry.<br>**East** - Mukari Laundry to Horizon Estate to Nerekar Building to Karanja Road to Santosh Ice Cream to Shivam Apartment.<br>**South** - Shivam Apartment to Jadhav's Building to St. Mary's School Ground to Deulwadi Shankar Temple.<br>**West** - Deulwadi Shankar Temple to Raju Kushaba Patil's House to Datta Temple to Mr. Balasaheb Thackeray Sports Complex to Swami Vivekananda Chowk to Raj Arcade Building. | 8 A = 1<br>8 B = 1<br>Total = 2 |
| **WARD 9**<br>Total Population 3148<br>SC Population-151<br>ST Population-63 | 9A, 9B | **Location** - Vaishnavi Hotel, Panchayat Samiti Office, Nagar Parishad Office, PJ Patil Bungalow, Siddhi Vinayak Society, Omkar Colony, Thaliveera, Kumbhar Wada, Goramulla Property. Income from Bapusheth Wadi to Ganu Property.<br>**North** - Kegaon Road from Kumbharwada to Vaishnavi Hotel.<br>**East** - Vaishnavi Hotel to Vivekananda Chowk to Panchayat Samiti Office to Yeshidevi Mandir Chowk to Bapusheth Wadi to Azam Tungekar's building to building of Mr. Ganu and AK Developers in Mhatavali Survey No. 74/3/ A.<br>**South** - From the building of Mr. Ganu and AK Developers in Mhatavali Survey No. 74/3 / A to the house of PJ Patil to Siddhi Vinayak Society to Omkar Colony.<br>**West** - From Omkar Colony to Thali Vira to Kumbharwada Goramulla property. | 9 A = 1<br>9 B = 1<br>Total = 2 |
| **WARD 10**<br>Total Population 3806<br>SC Population-238<br>ST Population-88 | 10A, 10B, 10 C | **Location** - Sane Guruji Kindergarten, Vimalan Lake, Kamtha, Kamgar Vasahat, Ayodhya Society, Karanja Road, Sai Kiran Apartment, Anand Nagar, Bhiwandiwala Garden.<br>**North** - Vivekananda Chowk to Sane Guruji Udyan to Vimala Lake to Deulwadi Dharamsala to Vastaraj House to Kamtha Road to Old Kamgar Vasahat to Ayodhya Society to Karanja Road from Sahyadri Hotel to Palvi Hospital to Garib Nawaz Building to Rubina Apartment.<br>**East** - Rubina Apartment to Palvi Hospital to Medina Complex to Sai Kiran Society.<br>**South** - From Old Sai Kiran Society to Liberty Park Municipal Area to Manewadi Kamtha.<br>**West** - Manewadi Kamtha to Bhiwandiwala Garden to New Kamtha Nagaon Road to Mahatwali Survey No. 8/1 / A to N.I High school grounds to N.I. High School Building to Sane Guruji Udyan to Swami Vivekananda Chowk. | 10 A = 1<br>10 B = 1<br>10 C = 1<br>Total = 3 |

**NOTE:-**

1. In case of any discrepancy in description of ward in the Marathi and English Notification, the description as per boundaries shown in the map shall be treated as valid.

2. A map of the Municipal Council showing the limits of the wards is available during office hours for inspection in the office of the Municipal Council.

Place :- Uran

Date :- 29/09/2025

**Sd/-**
**(Jeevan Patil)**
Chief Officer,
Uran Municipal Council, Uran

# ‘आशिया किंग’ टीम इंडिया मालामाल!

## बीसीसीआयकडून २१ कोटींच्या बक्षिसाची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाने आशिया कप २०२५च्या अंतिम सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा पराभव करत पुन्हा एकदा जेतेपदावर आपले नाव कोरले. या विजयानंतर बीसीसीआयने एक्सवर मोठी घोषणा केली.

भारताने पाकिस्तानने दिलेले १४७ धावांचे आव्हान १९.४ षटकात पाच फलंदाजांच्या मोबदल्यात पार केले. या विजयाचा शिल्पकार तिलक वर्मा ठरला, ज्याने ६९ धावांची मॅचविनिंग खेळी केली.

भारताने रविवारच्या सामन्यात पाकिस्तानचा आशिया कपमध्ये तिसऱ्यांदा पराभव केला. यापूर्वी ग्रुप स्टेज, त्यानंतर सुपर ४ आणि आता फायनलमध्येही पाकिस्तानला भारताने लोळवले. पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर याची पार्श्वभूमी असलेल्या यंदाच्या आशिया कपमध्ये भारत पाकिस्तान सामन्यादरम्यान अनेक वादग्रस्त प्रसंग घडले होते. त्यामुळे आशिया कपची यंदाची फायनल हाय व्होल्टेज होती. त्यातच भारतीय संघातील आणि पाकिस्तानी संघातील काही खेळाडूंवर आयसीसीने कारवाईचा बडगा उगारला होता.



टीम इंडियाच्या विजयानंतर बीसीसीआय आपल्या एक्स प्लॅटफॉर्मवर लिहिले की, ‘३ वार ० प्रतिक्रिया आशिया कप चॅम्पियन संदेश मिळाला आहे. टीम इंडिया आणि सहकाऱ्यांना २१ कोटी रुपयांच्या बक्षिसाची घोषणा करत आहोत.’

सामन्याबद्दल बोलायचे झाले तर दमदार सुरुवात करणाऱ्या पाकिस्तानला भारतीय फिरकीपटूंनी १४७ धावात रोखत सामन्यावर पकड निर्माण करून दिली होती. त्यानंतर फलंदाजी करताना भारताची सुरुवात खराब झाली होती, परंतु तिलक वर्मा, संजू सॅमसन आणि शिवम दुबे यांनी डाव सावरत भारताचा विजय साकार केला.

तिलक वर्माने ५३ चेंडूत नाबाद ६९ धावा, तर संजू सॅमसनने २४ धावांचे योगदान दिले. त्यानंतर आलेल्या शिवम दुबेने २२ चेंडूत ३३ धावांची खेळी करत भारताला विजयाच्या जवळ पोहचवले. शेवटी रिंकू सिंहने चौकार मारत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. गोलंदाजीबद्दल सांगायचे झाले तर भारताकडून कुलदीप यादवने चार, तर वरुण चक्रवर्ती, अक्षर पटेल आणि जसप्रीत बुमराह यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. फायलन जिंकून देणाऱ्या तिलक वर्माला सामनावीराचा पुरस्कार, तर अभिषेक शर्माला मालिकेचा मानकरी घोषित करण्यात आले.

दरम्यान, भारतीय संघाने आशिया क्रिकेट काऊन्सिलचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांच्या हातून विजयाची ट्रॉफी आणि मेडल्स घेण्यास नकार दिला. यानंतर मैदानावर ट्रॉफी आणली गेली नाही. त्यामुळे नक्वी यांनी आशिया कपची ट्रॉफी पळवली असा आरोपदेखील त्यांच्यावर होत आहे.

# रायगडच्या रोशनी पारधीची महाराष्ट्राच्या क्रिकेट संघात निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील महाड येथील रोशनी रवींद्र पारधी हिची पुढील क्रिकेट हंगामासाठी महाराष्ट्राच्या वरिष्ठ महिला क्रिकेट संघात निवड करण्यात आली आहे. रोशनी अवघ्या १६ वर्षांची असून महाराष्ट्र संघात निवड झालेली ती रायगडची पहिली महिला क्रिकेटपटू ठरली आहे.

रोशनी पारधी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन व महाडच्या एसबीसी क्रिकेट अकॅडमीची अष्टपैलू खेळाडू आहे. ती जलदगती गोलंदाज व सलामीची फलंदाज आहे. याआधी तिची महाराष्ट्राच्या १५, १७ व १९ वर्षाखालील मुलींच्या क्रिकेट संघात झाली होती. गतवर्षी झालेल्या आंतरजिल्हा १५ वर्षाखालील मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत रोशनीने लागोपाठ तीन शतके झळकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.



जलदगती गोलंदाज व सलामीवीर फलंदाज म्हणून तिने रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघासाठी सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. रायगड संघातून आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेत खेळताना अष्टपैलू खेळाच्या जोरावर रोशनीने आजवर अनेक शतके झळकावली व फलंदाजही बाद केले आहेत. त्यामुळे महाराष्ट्राच्या विविध वयोगटाच्या संघात तिची निवड झाली. आता तिची महाराष्ट्राच्या वरिष्ठ महिला संघात निवड झाली आहे.

रोशनीची महाराष्ट्राच्या वरिष्ठ संघात निवड झाल्याबद्दल तिचे वडील रवींद्र पारधी, एसबीसी क्रिकेट अकॅडमी महाडचे अध्यक्ष बशीर चिचकर व प्रशिक्षक आवेश चिचकर यांनी आनंद व्यक्त केला. त्याचप्रमाणे आरडीसीए अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक, सर्व पदाधिकारी व सदस्यांनी सदस्य यांनी तिचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

> *रोशनी पारधी हिने लहान वयात मोठी भरारी घेऊन रायगडचे नाव रोशन केले आहे. महाराष्ट्राच्या संघात तिची निवड झाली आहे. भविष्यात भारतीय महिला संघात तिची निवड व्हावी अशी आमची इच्छा आहे. त्यासाठी तिला लागणारी सर्व मदत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन करेल.*
>
> ***–अनिरुद्ध पाटील,***
> *अध्यक्ष, आरडीसीए*



# केळवणे हायस्कूलची क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी

**उरण : बातमीदार**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या केळवणे येथील हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी पावसाळी तालुका क्रीडा स्पर्धेत दमदार कामगिरी केली आहे. विद्यालयाच्या तीन संघांनी खो-खोच्या अंतिम फेरीत विजय मिळवला आणि जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी आपली पात्रता निश्चित केली आहे.

अंडर १४ वयोगटातील मुलींच्या खो-खो संघाने चावणे विद्यालयावर विजय मिळवला. अंडर १७ मुलींच्या संघानेही चावणे विद्यालयाचा पराभव केला, तर अंडर १७ वयोगटातील मुलांनी कासारभट इंग्लिश मीडियम स्कूलविरुद्ध निर्णायक सामना जिंकला.

यासोबतच तालुका अॅथलेटिक्स स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. धावण्याच्या शर्यतीत ४०० मीटरमध्ये पूर्वा नवनीत मोकल हिने आणि ८०० मीटरमध्ये मुग्धा भास्कर म्हात्रेने प्रथम, तर यश विजय ठाकूर याने द्वितीय क्रमांक मिळविला आहे.

या यशाबद्दल मुख्याध्यापक रामचंद्र पाटील, क्रीडा शिक्षक अनमोल पगारे, देविदास गागुर्डे व शिक्षकवृंद तसेच सामाजिक कार्यकर्ते प्रेम म्हात्रे, अमित पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पिरामल फायनान्सचे टेबल टेनिसपटू मार्कंडेय उपाध्याय व पुष्पा उपाध्याय यांच्या सहकार्याने तसेच नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ, रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन नवीन पनवेल येथील सिडको समाजमंदिरात करण्यात आले होते. स्पर्धेस खेळाडूंचा प्रतिसाद लाभला.

स्पर्धेचे उद्घाटन व बक्षीस वितरण समारंभ शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस प्रशिक्षक व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांच्या हस्ते झाले. स्पर्धेचे चीफ रेफ्री म्हणून शामल डेबार्मा यांनी काम पाहिले.




### गटनिहाय निकाल

(विजेते व उपविजेते)

नवोदित मुली : रिया ठाकूर सिंघानिया स्कूल, डेविल मोरे कारमेल हायस्कूल पेण, मुले : सुस्मित भिडे सीपी गोयंका स्कूल, विहान मंदार पुरोहित डीपीएस स्कूल पनवेल; ११ वर्षाखालील मुली : अनिश भवर लोधा वर्ल्ड तळोजा, आराध्य शेती रेड क्लिफ स्कूल उलवे, मुले : अर्णव साळवकर डी.डी. विसपुते स्कूल नवीन पनवेल, शिवम दुबे ओंकार इंटरनॅशनल स्कूल; १३ वर्षाखालील मुली : त्रिशा पावशे डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल, श्रेया अशोक जानकर सिकेटी स्कूल, मुले : आदित्य जोग रॉयल इंटरनॅशनल स्कूल, प्राकेत गोयल बालभारती पब्लिक स्कूल; १५ वर्षाखालील मुली : त्रिशा पावशे डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल, श्रेया अशोक जानकर सीकेटी स्कूल नवीन पनवेल, मुले : अद्वित गुप्ता डीपीएस स्कूल नेरूळ, प्राकेत गोयल बालभारती पब्लिक स्कूल; १७ वर्षाखालील मुली : त्रिशा पावशे डीएव्ही पब्लिक स्कूल पनवेल, श्रेया अशोक जानकर सीकेटी स्कूल पनवेल, मुले : अद्वित गुप्ता डीपीएस स्कूल नेरूळ, वैष्णव कुटे संजय हेगडे स्पोर्ट्स अकॅडमी; १९ वर्षाखालील मुली : जिया नेगी डीएव्ही पब्लिक स्कूल खारघर, शताक्षी सिन्हा एनआयएफटी खारघर, मुले : अद्वित गुप्ता डीपीएस स्कूल नेरूळ, कार्तिकेय अगरवाल एनएमआयएमएस खारघर; महिला : सिद्धी कोलेकर पनवेल, सताक्षी सिन्हा एनइएफटी खारघर, पुरुष लोकेश पटवा खारघर, आशिष फोगाट, खारघर; ज्येष्ठ पुरुष : समीर शिंदे नवी मुंबई, पॉल डिमेलो नवी मुंबई.

**नवरंग | रंग मोरपंखी**



सीकेटी विद्यालय इंग्लिश मीडियम प्राथमिक विभाग, नवीन पनवेल



डी.वाय. पाटील स्कूल ऑफ आयुर्वेद, नेरूळ, नवी मुंबई



आदित्य एन्व्हायरमेंट लॅब, मोहोपाडा



विठ्ठल रुक्मिणी महिला मंडळ रुद्रवली, माणगाव




एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अ‍ॅण्ड रिसर्च, कामोठे

# भारत आपला बाप होता आणि राहणार!

## पाकिस्तानी चाहत्याने स्वत:च्याच संघाची काढली लाज

**कराची : वृत्तसंस्था**

आशिया चषक २०२५च्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा पराभव केला आणि भारतात दिवाळीच्या एक महिना आधीच दिवाळी साजरी झाली. भारताच्या या विजयानंतर पाकिस्तान संघ व खेळाडूंना सोशल मीडियावर ट्रोल केले जात आहे. विशेष म्हणजे पाकिस्तान संघाच्या चाहत्यांकडूनच आपल्या संघाच्या कामगिरीवर तोंडसुख घेतले जात आहे. पाकिस्तानच्या अशाच एका चाहत्याचा एक व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.

एका चाहत्याने एका व्हिडीओमध्ये दिलेल्या प्रतिक्रियेत पाकिस्तान संघाला अक्षरश: शिव्यांची लाखोली वाहिली. बाबर आझम सोडा, अख्खा पाकिस्तान भारताशी खेळला तरी आपण भारताला हरवू शकत नाही. आपली लायकीच नाहीये त्यांच्याविरुद्ध जिंकायची. आपल्याला त्यांनी असा काही धडा शिकवलाय की आपल्या कितीही पिढ्या जन्माला आल्या तरी आपण भारताला पराभूत करू शकत नाही. भारत आपला बाप होता आणि बाप राहणार, अशा शब्दांत या चाहत्याने आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.



या संतप्त चाहत्याने आम्ही कधीपर्यंत रडायचं. आमच्या पाकिस्तानमध्ये दुसरा कुठलाच आनंद नाही. एक क्रिकेट आहे, पण त्याचीही या लोकांनी पार वाट लावून टाकली आहे. मूर्खांना टीममध्ये घेऊन फिरतोय आपण. हुसैन तलत कॅच सोडतोय, त्याला संघात घेऊन फिरतोय आपण. आम्ही काय करायचं? कुठे जायचं? मला पाकिस्तान सरकारकडून उत्तर हवंय, असं म्हणत या चाहत्यानं आशिया चषकातील पराभवासाठी थेट पाकिस्तान सरकारलाच लक्ष्य केले आहे.

हा पाकिस्तानी चाहता इतका संतापला होता की त्याने चक्क पाकिस्तानच्या संघाची तुलना भारताच्या पायातल्या चपलेशी केली. ही काय टीम आहे का? आपण काय भारताच्या बरोबरीचे आहोत का? आपण त्यांच्या पायातल्या चपलेच्याही बरोबरीचे नाहीत. मी आज सगळ्यांसमोर हे बोलतोय. इंडिया, आय लव्ह यू. आमच्या खेळाडूंशी हस्तांदोलन न करून तुम्ही बरोबरच केले. तुम्ही जर त्यांच्याशी हस्तांदोलन केले असते, तर तुम्हालाही अपशकुन झाला असता. बस, आणखी किती शिव्या देऊ मी यांना? असा उद्विग्न सवालही या चाहत्याने शेवटी केला.

# भारतीय संघ ‘सॅफ’ विजेता

**कोलंबो :** भारतीय युवा संघाने पेनल्टी शूटआऊटमध्ये बांगलादेशचा ४-१ असा पराभव करत सातवे ‘सॅफ’ १९ वर्षांखालील चॅम्पियनशिप विजेतेपदावर मोहोर उमटवली.

सामन्याच्या मध्यंतरापर्यंत भारताने दल्लामुओन गांगटे (४’) आणि अझलान शाह केएच (३८’) यांच्या गोलच्या बळावर २-१ अशी आघाडी घेतली होती, मात्र बांगलादेशने भरपाई वेळेत इहसान हबीब रिदुआनने केलेल्या गोलमुळे सामना २-२ असा बरोबरीत आणला. त्यामुळे निकाल पेनल्टी शूटआऊटमध्ये लागला.

# सूर्यकुमार यादवकडून आशिया चषकाचे मानधन भारतीय लष्कराला



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील संघाने दुबईत पाकिस्तानवर पाच गडी राखून विजय मिळवला. सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत सूर्यकुमार यादव याने आपले संपूर्ण आशिया चषक २०२५चे मानधन भारतीय लष्कराला दान करण्याची घोषणा केली.

माध्यमांशी बोलताना सूर्यकुमार यादव म्हणाला, या स्पर्धेतील माझी मॅच फी मी आपल्या सशस्त्र दलांना आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्यांच्या कुटुंबियांना मदत करण्यासाठी देण्याचा निर्णय घेतला आहे. पुढे तो म्हणाला, मी क्रिकेट खेळायला सुरुवात केल्यापासून, क्रिकेटचे अनुसरण करायला सुरुवात केल्यापासून अशी गोष्ट कधीही पाहिली नाही की, एका विजेत्या संघाला ट्रॉफी नाकारली जात आहे आणि तीदेखील कष्टाने मिळवलेली. मला वाटते की, आम्ही या ट्रॉफीसाठी पात्र होतो. मी याबद्दल अधिक काही बोलू शकत नाही.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com